
# मेहता मराठी ग्रंथजगत

ऑक्टोबर, २०२०
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष विसावे
अंक दहावा




सर्व वाचकांना नवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा !

FRANKFURTER
BUCHMESSE

जगातली सर्वात मोठी पुस्तकांची जत्रा म्हणजे **फ्रँकफर्ट बुक फेअर.** दरवर्षी जगभरच्या साहित्यिकांची मांदियाळी इथे जमते. यंदा हे बुक फेअर डिजिटल स्वरूपात येत आहे. **१४ ते १८ ऑक्टोबर** दरम्यान होत असलेल्या या प्रदर्शनात **मेहता पब्लिशिंग हाऊस**ला सहभागाची संधी मिळाली आहे. पब्लिशर्स एक्स्चेंजचा भारतीय प्रादेशिक प्रकाशकांचा समूह यानिमित्ताने एकत्रित आला आहे. अनुवादाच्या क्षेत्रात नवनव्या संधी निर्माण करण्यासाठी हे व्यासपीठ मार्गदर्शक ठरेल, अशी आशा आहे.

Publishers' Exchange
IDEAS, RIGHTS, RESOURCES AND NETWORKING






# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ ऑक्टोबर २०२० ◆ वर्ष विसावे ◆ अंक दहावा

**संपादक**
सुनील मेहता
**कार्यकारी संपादक**
शंकर सारडा
**संपादन साहाय्य**
योजना यादव
**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.
**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस
**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


— अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **विशेष लेख** | ९ |
| **प्रेरक** | १८ |
| **श्रद्धांजली** | २४ |
| **बोलू मराठी कौतुके** | २६ |
| **चर्चेतील पुस्तक** | २८ |
| **अभिप्राय** | ३६ |
| **पुस्तक परिचय** | |
| भावनागुलो | ३८ |
| शोकोल ग्रिह हारालो जार | ४२ |
| उदयन | ४६ |
| बिंदूसरोवर | ५० |
| दृष्टिदाता | ५४ |
| महागाई एक चक्रव्यूह | ५८ |
| **दिनविशेष** | ६० |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

**संपादकीय**

आपण सर्वच जण काळाच्या अशा टप्प्यावर उभे आहोत, जिथं अनिश्चिततेचे ढग भरून आले आहेत. एका कृष्णछायेत वावरणारा समाज कधीतरी आभाळ मोकळं होईल म्हणून वाट पाहत बसला आहे. तो क्षण दृष्टिपथात येईपर्यंत आपल्याला आपल्या वैयक्तिक परिघाबरोबरच सामाजिक परिघातही सकारात्मकतेची रुजवण करण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत. आणि यासाठी आपल्याला आपल्या लाडक्या पुस्तकांची सदैव साथ असेल.

जग जवळ आलं म्हणत असतानाच कोरोनाच्या संकटानं माणसामाणसातलं अंतर अधिक गडद केलं. स्वच्छंदी बागडणं बंद करून त्याला एके जागी बांधून ठेवलं; पण आता आपण भीतीचं सावट स्वतःसोबत घेऊनच बाहेर पडू लागलो आहोत. थांबून राहणं शक्य नाही, हे खरंच आहे; पण बाहेर पडताना स्वतःसोबत इतरांच्या आरोग्याचीही जबाबदारी आपल्यावर आहे, हे भान आपण कायम ठेवायला हवं. कोरोनाविषयी या गोष्टी आपण अनेकदा ऐकल्या, वाचल्या असतील; पण तरीही त्याची शास्त्रशुद्ध माहिती आपल्याला हवीच असते. या माहितीच्या आधारेच आपण या विरोधातला लढा लढू शकणार आहोत. म्हणूनच आम्ही डॉ. अनिल गांधी लिखित **'युद्ध कोरोनाशी'** हे पुस्तक आपल्यासाठी घेऊन येत आहोत. कोव्हिडसंदर्भातील अनेक अज्ञात पैलूंचं दर्शन हे पुस्तक घडवतं; पण याशिवाय निसर्गातला मानवी हस्तक्षेप

आणि त्याचे दूरगामी परिणाम, मानवी मनोव्यापार, प्रशासकीय प्रयत्न अशा विविध विषयांनाही हे पुस्तक स्पर्श करतं.

बाहेरची परिस्थिती कितीही निराशाजनक असली, तरी काही माणसं आपल्या ध्येयापासून हटत नाहीत. पुस्तकवेडी माणसंही अशीच असतात. अशाच दोन वल्ली आपल्याला या अंकात भेटतील. पहिले जेजुरीचे ज्ञानेश्वर भोईटे गुरुजी, तर दुसरे सांगलीतील खानापूरचे रेवणसिद्ध कदम. एक बुजुर्ग, तर एक तरुण; पण दोघांनीही आपलं जीवन पुस्तकप्रसाराला वाहिलेलं आहे. या अंकात या दोघांच्या कामाचा संक्षिप्त आढावा वाचायला मिळेल आणि या दोघांचं पुस्तकप्रेम तुम्हालाही प्रेरित करेल, हे नक्की.

महाराष्ट्रातील घराघरातील स्वयंपाकाचा मार्गदर्शक असणाऱ्या कमलाबाई ओगले लिखित रुचिरा पुस्तकाने प्रकाशनाची तब्बल पन्नास वर्षे पूर्ण केली आहेत. रुचिरा म्हणजे जणू पाकशास्त्रातील आद्यग्रंथच. हे पुस्तक १९७० साली प्रकाशित झालं. पन्नास वर्षं चिरंतनपणे पुनर्मुद्रण होत राहिलेल्या निवडक पुस्तकांपैकी हे पुस्तक आहे. रुचिराच्या या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा आढावाही या अंकात वाचायला मिळेल.

वाचनाची अविट गोडी सदैव आपल्यासोबत असावी, (E book, Audio book आणि सर्व स्वरूपातील पुस्तके) यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील आहोत. आणि यापुढेही असेच प्रयत्नशील असू; पण वाचनातून मिळणारं बळ आणि आरोग्यदायी सवयी अंगीकारून आपण आपली काळजी घेत राहा.



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये
पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

## डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये
पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

### सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

## बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**wordpowerbookshop@gmail.com**

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon


GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**



**www.amazon.in**

**play.google.com**


**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**


विशेष लेख

## 'रुचिरा'चा रुचकर सुवर्ण महोत्सव...



आज टी.व्ही., यु ट्यूब व्हिडिओ, ब्लॉग्ज, वेबिनार इत्यादी माध्यमांद्वारे जगाच्या कानाकोपऱ्यातील पदार्थ शिकण्याचा काळ आहे. या काळात एखाद्या मराठी पाकशास्त्राच्या पुस्तकानं पन्नास वर्षं आपली जादू कायम ठेवणं म्हणजे खायची गोष्ट नाही. कमलाबाई ओगले या अन्नपूर्णेने आपल्या हाताची चव पुस्तकरूपाने घराघरात पोचवली. मार्च २०२०मध्ये 'रुचिरा' या आपल्या मराठमोळ्या पुस्तकानं सुवर्ण महोत्सव साजरा केला. रोजच्या स्वयंपाकाबाबत योग्य आणि बिनचूक मार्गदर्शन करणारं पाकशास्त्राचं हे अभिनव मराठी पुस्तक प्रथम १९७०साली बाजारात आलं. १९९० नंतर मेहता पब्लिशिंग हाऊसने पुढील आवृत्त्या प्रकाशित केल्या. २०२०मध्ये या संग्रहाला ५० वर्षं पूर्ण झाली आहेत. एकीकडे कमलाबाई ओगले यांची या वर्षी १०७वी जयंती साजरी होत असताना, रुचिराचाही सुवर्ण महोत्सव साजरा होणं, ही मराठी प्रकाशन व्यवसायासही कौतुकास्पद बाब आहे. शिवाय, हे पुस्तक कन्नड, हिंदी आणि




इंग्रजी भाषेतसुद्धा उपलब्ध आहे. रुचिरा एक आणि रुचिरा दोन असे ते दोन भागांत मिळते.

'समाधानाचा जन्म स्वयंपाकघरात होतो' असं मानणाऱ्या कमलाबाई ओगले यांच्या लेखणीतून 'रुचिरा'चा जन्म झाला. मुळातच स्वयंपाकाची आवड असल्याने लग्न झाल्यावर कमलाबाईंनी आपल्या सासूबाईंच्या हाताखाली स्वयंपाकाचे धडे घेतले. पुढे त्यांच्या यजमानांची बदली वेगवेगळ्या शहरांत होऊ लागली आणि त्यांच्यावर स्वतंत्रपणे स्वयंपाकाची जबाबदारी पडली. काही काळानंतर मुंबईला वास्तव्यास असताना त्यांनी पाककृती स्पर्धांमध्ये भाग घेण्यास सुरुवात केली आणि अनेकदा बक्षीस मिळवले. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. त्या प्रात्यक्षिके देऊ लागल्या. स्त्रियांच्या मागणीमुळे क्लासेससुद्धा सुरू केले. कमलाबाईंनी अनेक स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून काम केले. त्यांच्या कौशल्यामुळे अर्थातच पुस्तकाची मागणी जोर धरू लागली आणि 'रुचिरा'चा जन्म झाला. या सगळ्या कामात त्यांच्या कुटुंबीयांचा, प्रामुख्याने त्यांच्या यजमानांचा पुढाकार होता. मराठी शाकाहारी पदार्थांचं मार्गदर्शक पुस्तक असणाऱ्या रुचिराला पहिल्या आवृत्तीपासूनच वाचकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. कमलाबाईंच्या पाककृती, लिखाणाची शैली यामुळे त्यांचे कौतुक झाले. परदेशात जाऊनही त्यांनी पाककौशल्याचे धडे दिले. आकाशवाणी, दूरदर्शन, मुलाखती या माध्यमांतून लोकांशी संवाद साधला.

स्वयंपाकघरात नव्याने पाऊल ठेवणारीने सुरुवात कुठून करायची इथपासून शिकवणारं ‘रुचिरा’ त्यांनी आईच्या मायेनं प्रत्येकीच्या हातात ठेवलं. कितीतरी मुली आईच्या, आजीच्या, सासूच्या हाताखाली पदार्थ शिकतात. तयारी करून देताना जुजबी कृती डोळयांसमोरून गेली तरी एकटीने करताना अनेक अडचणी येतात. अंदाज चुकतात, प्रमाण फसतं. अशा वेळी बाटलीतल्या जिनीसारखं धावून येतं ते ‘रुचिरा’! लग्नात आवर्जून दिली जणारी भेट किंवा आईने परगावी जाताना मायेने हातात दिलेला दिलासा!

अनेक तरुण मुलींची आजकाल स्वयंपाकाशी तोंडओळख देखील नसते. लहानपणी अभ्यास, तरुणपणी करिअर या सगळ्यांमध्ये बिझी असल्यामुळे स्वयंपाकघराशी म्हणावा तसा संबंध येत नाही. शिक्षण किंवा नोकरीमुळे घराबाहेर पडल्यावर जेव्हा बाहेरचं खाऊन कंटाळा येतो तेव्हा घरच्यासारखे जेवण मिळावे यासाठी धडपड सुरू होते किंवा लग्न झाल्यावर जेव्हा जबाबदारी पडते अशा वेळी साध्या, सोप्या शब्दांत मराठमोळ्या पदार्थांची ओळख करून देणारं ‘रुचिरा’सारखं पुस्तक हाताशी असणं म्हणजे पर्वणीच! नवविवाहिता आणि कर्ती सवरती मुरलेली गृहिणी दोघींनाही अडचणीच्या वेळी हात देणारं असं हे पुस्तक लोकप्रिय झालं यात नवल ते काय? नव्याने स्वयंपाक शिकणाऱ्या अनेक सख्यांची, इतकंच काय परदेशी जाऊन घरच्या जेवणाची आठवण आल्यामुळे गॅसवर काहीतरी खुडबूड करणाऱ्या मुलांचीसुद्धा हक्काची हाक म्हणजे ‘रुचिरा’! अनेक सुनांची सासू, अनेक नातींची आजी होऊन त्यांच्या स्वयंपाकघरात त्यांनी हक्काचं स्थान मिळवलं.

पारंपरिक मराठी पदार्थ शिकण्यासाठी डोळे झाकून विश्वास टाकावा असं पुस्तक म्हणजे ‘रुचिरा.’ आजच्या आधुनिक खाद्यसंस्कृतीमध्ये मागे पडलेल्या अनेक पारंपरिक पदार्थांची भेट या पुस्तकात होते. रावणभात, गुरवळ्या, चंपाकळी, अशा काळाच्या ओघात विसरून गेलेल्या पदार्थांना आजच्या काळातल्या सुगरणी पुन्हा एकदा प्रकाशझोतात आणू शकतात.

रोजच्या जेवणाचे पदार्थ, सणासुदीसाठी थोडे वेगळे पदार्थ, मधल्या वेळचे खाणे असे पदार्थांचे वर्गीकरण केल्यामुळे पदार्थ शोधणे सोपे जाते. अनेक सोप्या भाज्या, भरित, कोशिंबिरी, चटण्या यांच्या कृती सविस्तर

दिल्या आहेत. साध्या वांग्याच्या भरताचे चार प्रकार आहेत. रोजच्या भाज्यांमध्ये वैविध्य आणण्यासाठी लहानसहान बदल त्या त्या ठिकाणीच दिलेले आहेत. खोबरे वापरण्याऐवजी दाणेकूट, मसाल्यातील बदल चटकन करून बघता येतात.

थोडक्यात आणि सोप्या भाषेत पदार्थांची कृती देण्यात आली आहे. तपशीलवार साहित्य तेसुद्धा प्रमाणासहित आणि नंतर कृती असा सुटसुटीत क्रम ठेवण्यात आला आहे. प्रमाण देताना ग्रॅम, लिटर, किलो ही क्लिष्ट परिमाणे न देता रोजच्या वापरातली वाटी आणि चमचा या प्रमाणांचा वापर केला आहे. पुस्तकात दिलेली चित्रेसुद्धा आकर्षक आहेत. सुगरणीची करामत, इतर प्रांतांतील पदार्थसुद्धा नेटक्या पद्धतीने टिपले आहेत.

त्या काळात नवीन असलेला प्रेझेंटेशन हा विषयसुद्धा 'सुगरणीची करामत- सजावट' या स्वतंत्र विभागाखाली मांडण्यात आला आहे. आज या विषयाला अनन्यसाधारण महत्त्व आलं असलं तरी त्यांनी लिहिलेल्या काळात त्याचे आज आहे तसे प्रस्थ नव्हते; पण तरीही खाद्यपदार्थ बनवल्यानंतर स्त्रियांच्या कौशल्याला वाव मिळावा आणि आकर्षक पद्धतीने पदार्थांची मांडणी करता यावी, हा आधुनिक विचार तेव्हा केलेला दिसून येतो.

सगळ्यांना सोबत घेऊन चालणे हे तर मराठी संस्कृतीचे वैशिष्ट्य. 'रुचिरा' फक्त मराठी खाद्यसंस्कृतीपुरतेच मर्यादित न राहता इतर प्रांतांची लहानशी सहलसुद्धा घडवून आणते. महाराष्ट्राबाहेरील विविध राज्यांमध्ये बनवले जाणारे लोकप्रिय पदार्थ निवडून त्यांच्या कृतीसुद्धा समाविष्ट आहेत. उदाहरणार्थ, रसगुल्ला, फाफडा, उंधियु असे खवय्ये लोकांचे आवडीचे प्रकार दिलेले आहेत. इतकंच काय, पण सातासमुद्रापलीकडे जाऊन बिस्किटे, केक्स, अगदी डोनटसारखा आताच्या काळात जास्त प्रसिद्ध असलेला परदेशी प्रकारसुद्धा त्यांनी आधी करून मग पुस्तकात कृती दिली आहे.

साठवणीचे पदार्थ करताना मुरलेल्या गृहिणीलासुद्धा प्रश्न पडतात. त्यासाठी मुरांबे, जॅम, लोणची या पदार्थांसाठी काटेकोर कृती कमलाबाईंनी दिलेली आहे.

स्वयंपाकाच्या बाबतीत सर्वांत महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे पूर्वतयारी. हे

लक्षात घेऊन हाताशी लागणाऱ्या प्राथमिक पदार्थांची कृती दिलेली आहे. कच्चा मसाला, फोडण्या, पाक अशा अनेक गोष्टी आधीच तयार असल्या तर गृहिणीचे श्रम आणि वेळ दोन्ही वाचतात. पुस्तक चाळताना त्यांनी फक्त रेसिपी किंवा कृती देणे एवढाच उद्देश ठेवलेला नसून, स्वयंपाकाशी निगडित अनेक बारीकसारीक गोष्टींचा विचार केला आहे, हे लक्षात येते. बऱ्याचदा प्रमाण चुकते, पदार्थ कमी शिजतो किंवा करपतो, काहीतरी अडचण येते आणि पदार्थ फसतो. अशा अडचणी सोडवण्यासाठी काही उपयुक्त टिप्स-सुद्धा शेवटी दिलेल्या आहेत. अगदी सण-समारंभाच्या निमित्ताने जास्त प्रमाणात पदार्थ करावे लागल्यास ती मापेसुद्धा दिली आहेत.

सिने-नाट्य क्षेत्रातील कलाकार, कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणारी मंडळी, नवशिके पुरुष अशा अनेक जणांना रुचिराने मदतीचा हात दिला आहे. लंडनमध्ये वास्तव्यास असलेल्या प्रीती देव यांनी तर 'रुचिरा'मधल्या अनेक पाककृती करून आपल्या 'रुचिरा विदेशिनी' या ब्लॉगवर त्याबद्दल माहिती दिलेली आहे. सातासमुद्रापार युरोपियन, अमेरिकन, ऑस्ट्रेलियन स्वयंपाकघरांच्या ओट्यांवसुद्धा 'रुचिरा'ने स्थान पटकावले आहे.

'रुचिरा' आपल्याला त्या काळातील संस्कृतीची, भाषेची, खाद्यसंस्कृतीची ओळख करून देतं. ज्या काळात त्या शिकल्या त्या काळाचं प्रतिबिंब त्यांच्या लिखाणात वेगवेगळ्या तऱ्हांनी डोकावतं.

आजच्या काळात फ्यूजन, लो कार्ब, प्रोटीन अशी नानाविध बिरुदं लावून पदार्थ समोर येतात. साधं मोदकाचं उदाहरण घेतलं तर आंबा मोदक, पान मोदक, गुलकंद मोदक, चॉकोलेट मोदक असे नवीन नवीन प्रकार उपलब्ध आहेत; पण आपला मूळ, अस्सल मोदक जर शोधायचा असेल तर एखाद्याला संदर्भग्रंथाचीच गरज पडेल. आणि अशावेळी 'रुचिरा'सारख्या विश्वासार्ह स्त्रोताकडेच मोर्चा वळवावा लागतो.

एकूणच, जगभरात पारंपरिक गोष्टींची लाट आली आहे. पुन्हा आपले मूळ शोधून जगण्याच्या, खाण्यापिण्याच्या पद्धती बदलून बघण्याची गरज निर्माण झाली आहे. वरण, भात, भाजी, पोळी, कोशिंबिर, चटणी असे चारीठाव जेवण घेतले पाहिजे, असे जेव्हा आहारतज्ज्ञ सांगतात तेव्हा हीच आपली खाद्यपरंपरा आहे, हे आपल्याला नव्याने उमगते. अशा वेळी 'अन्न हे पूर्णब्रह्म' या उक्तीला प्रमाण मानून लिहिलेल्या 'रुचिरा'चे वेगळेपण

अधोरेखित होते.

मागील पिढ्यांच्या स्वयंपाकघरात हळूच डोकावून आपल्याला हव्या त्या गोष्टी गाठीशी बांधून पुन्हा आपल्या काळात परत येता येतं. आपल्याला आपल्या आजीला, मावशीला, सासूला भेटता येतं. कमलाबाईंच्या रूपात अनेक ओळखीचे पण काळाच्या पडद्याआड धूसर झालेले चेहरे आणि स्वयंपाकघरात राबणारे हात डोळ्यांसमोर येत राहतात. दोन-तीन दशकं ओलांडून मागे नेणारी 'रुचिरा' ही एक खिडकी आहे, जी आपल्याला आपल्या मुळांशी घेऊन जाते.

माणसाच्या मनापर्यंत पोहोचण्याचा मार्ग हा त्याच्या पोटातून जातो म्हणतात. एखादा नवीन पदार्थ शिकताना, आपल्या हाताची चव त्या पदार्थांत उतरवताना जेव्हा त्याला 'रुचिरा'चा अप्रत्यक्ष हात लागलेला असतो, तेव्हा कुणीतरी बोट पकडून आपल्याला शिकवतं आहे, ही जाणीव किती सुखावह आहे. खाण्यापिण्याच्या आवडीनिवडी बदलल्या, स्वयंपाकाची साधने बदलली, टेक्नॉलॉजीने स्वयंपाकघराचासुद्धा ताबा घ्यायला सुरुवात केली; पण अजूनही लाखो घरांमध्ये 'रुचिरा'चे स्थान अढळ आहे आणि अढळ राहणार! कारण 'अमुकतमुक करायचं आहे, एकदा रुचिरात बघ बरं कृती आणि प्रमाण' हे वाक्य मराठी कुटुंबात ऐकू येत राहणार! आणि मेहता पब्लिशिंग हाऊसनं हे पुस्तक ई-बुक स्वरूपातही उपलब्ध केलं असल्याने देशोदेशीच्या मराठी सुगरणींना याची कायम सोबत होत राहील.

**- निर्मिती कोलते**



## पुस्तकवेडे तरुण तुर्क...म्हातारे अर्क...

### ‘पुस्तकाचं घर’चा अभिनव उपक्रम

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यामधील साळशिंगे या छोट्याशा गावातलं तरुण व्यक्तिमत्त्व म्हणजे रेवणसिद्ध कदम. याच गावी त्यांनी ‘पुस्तकाचं घर’ नावाचा उपक्रम सुरू केला आहे. त्या माध्यमातून गावातील गरीब आणि गरजू मुलांना मोफत पुस्तकं वाचनासाठी दिली जातात आणि मुलंसुद्धा प्रामाणिकपणे पुस्तकं आणून जमा करतात. आज जवळपास १५००च्या वर पुस्तकं घरामध्ये आहेत. गावातील बरीच मुलं या ठिकाणी रविवारी येऊन पुस्तकं वाचतात किंवा पुस्तकं घरी घेऊन जातात. आठवड्यातला रविवार हा दिवस मुलांना पुस्तकांच्या देवाणघेवाणीसाठी राखून ठेवला आहे. १० नोव्हेंबर, २०१८ ला ‘पुस्तकाचं घर’ सुरू झाले. ही संकल्पना रेवणसिद्धच्या मोठ्या भावाची होती. तिला पुढे नेण्याचं काम रेवणसिद्धनं केलं. पुस्तकांच्या घराला गावातील आणि इतर बऱ्याच जणांचं मोठं योगदान आहे. सगळेजण आपल्या घराला विविध नावे देत असतात; परंतु कदम कुटुंबीयांनी घरालाच ‘पुस्तकाचं घर’ असं नावं दिलं आहे. या





उपक्रमात संपूर्ण कुटुंब आणि मित्रपरिवार उत्साहाने सहभागी होतो. आज पुस्तकाचं घर संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचलं आहे. लोकांची मदत होत आहे. समाजात खूप चांगली आणि मदतीला पुढं येणारी माणसं आहेत, हे या निमित्ताने जाणवलं. अगदी जवळच्या मित्रांपासून ते मराठी अभिनेते आणि अभिनेत्रीसुद्धा मदतीसाठी धावून आले आहेत. यामध्ये प्रिया बापट, सिद्धार्थ जाधव, पल्लवी पाटील, अश्विनी कासार, अभिज्ञा भावे, भाग्यश्री मोटे, या सर्वांनी व्हिडिओद्वारे पुस्तकाच्या घराची माहिती सर्वत्र पोहोचवली. त्यातून या उपक्रमासाठी पुस्तकरूपात मदतीचा ओघ सुरू झाला आहे. कोणाकडे जर नवीन, जुनी पुस्तकं असतील तर नक्की मदत करू शकता.

''गावातील मुलं पुस्तकं घेऊन जातात यातून त्यांचा नक्कीच फायदा होत असेल आणि हे यातून मिळणारं समाधान शब्दांत व्यक्त करता येणार नाही. इथून पुढे खूप जणांना पुस्तकाच्या घराची मदत होईल यासाठी नेहमी प्रयत्न करत राहीन.'' अशी भावना रेवणसिद्ध कदम व्यक्त करतात. खरोखरच पुस्तकाच्या घराचा उपक्रम आजच्या काळाची गरज आहे.

## पुस्तकप्रेमाला वयाचं बंधन नसतं...

पुस्तकप्रेमाला खरंच वयाचं बंधन नसतं. डोळ्यांच्या खाचा त्रास द्यायला लागल्या तरी पुस्तकांवर जडलेला जीव कमी होत नाहा, याचं चालतंबोलतं उहादरण म्हणजे जेजुरीचे ज्ञानेश्वर गुलाबराव भोईटे गुरुजी. भोईटे गुरुजींचा फोटो पाहून तुम्हाला त्यांच्या वयाचा अंदाज आलाच असेल; पण शरीर जर्जर झालं तरी भोईटे गुरुजींना पुस्तकांचं विश्व खुणावत राहतं आणि हे पुस्तक विश्वच त्यांना जगण्याची प्रेरणा देतं. वयाची सत्तरी ओलांडलेली असली तरी ते सहा हजार पुस्तकांचा संग्रह असणारं 'ज्ञानरंजन' वाचनालय चालवतात.

ज्ञानेश्वर गुलाबराव भोईटे हे व्यवसायानं शिक्षक. १९६४ साली त्यांचं ज्ञानदानाचं काम सुरू झालं आणि ग्रंथप्रसाराचंही. वि.स.खांडेकर, रणजित देसाई, व.पु.काळे यांच्यासारख्या लेखकांवर त्यांचं विशेष प्रेम. ते या पुस्तकांचा अक्षरश: फडशा पाडत असत. अत्रे-फडके युगात त्यांच्यात रुजलेल्या वाचनाच्या गोडीतूनच त्यांना ग्रंथसंग्रहाचं वेड लागलं. आंबेगावला त्यांनी सुरुवातीला सरस्वती वाचनालय सुरू केलं. कोथळे गावी जनसेवा वाचनालय सुरू केलं. १९५६ साली ते रस्त्यावरची छोटी छोटी पुस्तकं विकत घेऊन विद्यार्थ्यांना देत असत. एका वर्षी लोणी काळभोरला शिक्षकांच्या ट्रेनिंगसाठी गेलेले असताना त्यांनी तिथली ५६००० पुस्तकसंग्रह असलेली लायब्ररी पाहिली. सुदैवाने स्वतः भोईटे गुरुजींना ही लायब्ररी चालवण्यास मिळाली. आणि त्यांना ग्रंथालय निर्मितीचे धडे मिळत गेले. ज्यातून पुढे 'ज्ञानरंजन' वाचनालयाची पायाभरणी झाली. आज भोईटे गुरुजींचं पूर्ण कुटुंब या वाचनालयाच्या कामाला वाहिलेलं आहे; पण पुस्तकांची निवड करण्यापासून ते पुण्याला येऊन ग्रंथखरेदी करण्यापर्यंतची सर्व कामे सत्तरी ओलांडलेले गुरुजी स्वतः करतात.




ग्रंथप्रसारासाठी असलेल्या सर्व कार्यक्रम, अधिवेशनांना त्यांची हजेरी असते. शिवाय, त्यांनी गावातीलच दत्तक विद्या महामंडळ प्रशाला दत्तक घेतली असून, या शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तकांचा खजिना मिळावा व विविधांगी वाचन करता यावे, यासाठी शाळेला दरवर्षी नवनवीन पुस्तके भेट देत असतात.

✦

समुद्राच्या काठावर उभे राहून केवळ
पाण्याकडे बघण्याने समुद्र पार करता येत नाही.

**– रवींद्रनाथ टागोर**



प्रेरक

## खुद्द सुधा मूर्ती जेव्हा भाजीचे 'दुकान' लावतात...

इन्फोसिस फाउण्डेशनच्या अध्यक्ष,

ख्यातनाम लेखिका आणि भारतातील सर्वाधिक श्रीमंतांच्या यादीत नाव असलेल्या सुधा मूर्ती रस्त्यावर ताज्या भाजीचे देखणे दुकान मांडून बसल्या आहेत... साधा सुती सलवार-कमीज घातलेल्या सुधाताई हसतमुखाने भाजी विकत आहेत, असा एक फोटो समाजमाध्यमांमध्ये वेगाने 'व्हायरल' झाला. मागोमाग जाणकारांनी केलेले 'फॅक्ट चेक रिपोर्ट'सुद्धा आले. ते रिपोर्ट्स सांगतात, की हा फोटो चार वर्षांपूर्वीचा आहे आणि सुधाताई भेंडी-भोपळे-काकड्यांच्या गराड्यात दिसत असल्या तरी त्या भाजी विकायला बसलेल्या नसून, बंगळुरूमध्ये त्यांचे निवासस्थान असलेल्या जयानगर परिसरातल्या राघवेंद्र स्वामींच्या मठाबाहेर बसून त्या साधकांच्या भोजनासाठी आणलेल्या भाज्यांची विगतवारी करत आहेत; कारण त्या 'स्टोअर मॅनेजर' म्हणून मठात 'सेवा' देत आहेत. या मठात दरवर्षी तीन दिवसांचा 'राघवेंद्र आराधना महोत्सव' होतो.

या महोत्सवात सेवा देण्यासाठी सुधा मूर्ती भल्या पहाटेच मंदिरात जातात. तिथे स्वच्छतागृहांच्या सफाईपासून साधकांच्या स्वयंपाकाची तयारी, भाज्या चिरणे, भांडी घासणे अशी सर्व प्रकारची कामे करतात आणि नऊच्या सुमारास पुन्हा आपल्या कार्यालयात परतून आपल्या नेहमीच्या कामाला लागतात.



स्वत:च्या मना-स्वभावाला कुठल्याही प्रकारचा अहंभाव चिकटला असेल, तर तो गळून जावा म्हणून राघवेंद्र स्वामींच्या मठात सेवा देण्याचे काम आपण दरवर्षी करतो, असे सुधाताईंनी स्वत:च एका मुलाखतीत सांगितल्याचा दाखलाही कुणीतरी ट्विट केला. राघवेंद्र मठाच्या अधिकाऱ्यांनीही 'फोटोत दिसतात त्या सुधा मूर्तीच असून, त्या मठासाठी स्टोअर मॅनेजरची जबाबदारी पार पाडताना भाज्यांची देखरेख करत आहेत,' असा निर्वाळा दिल्याचीही बातमी मागोमाग आली. सध्या अत्र-तत्र-सर्वत्र सगळाच 'सोशल चिखल' उडत असताना अचानक समोर आलेला हा निर्मळ फोटो सुखद दिलासा ठरला, हे मात्र खरेच! सुधा मूर्ती या इन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती यांच्या पत्नी आणि इन्फोसिसच्या महत्त्वाच्या भागधारक. सध्याची त्यांची व्यक्तिगत संपत्तीच काही हजार कोटी रुपयांच्या घरात असल्याचा तपशील उपलब्ध आहे; पण ही सुधा मूर्ती यांची खरी ओळख नव्हे! १९९०च्या दशकात वेगाने उदयाला आलेल्या आणि पूर्वपुण्याई, वाडवडिलांचा सांपत्तिक / औद्योगिक वारसा नसताना केवळ स्वत:च्या बुद्धिमत्तेच्या जोरावर मोठी साम्राज्ये स्थापन करून यशवंत-कीर्तीवंत-धनवंत झालेल्या भारतीय मध्यमवर्गाचा अग्रणी चेहरा कोणता असे विचारले, तर त्याच्या उत्तरात 'इन्फोसिस'चा समस्त परिवार येईलच. त्यातही अग्रभागी असेल ते अर्थातच मूर्ती दाम्पत्य!

प्रचंड धनसंचय म्हणला म्हणजे भारतात गृहीतच धरले गेलेले व्यक्तिगत डामडौलाचे, पेज-थ्री दर्जाच्या चैनचंगळीचे, अति-वैभवशाली

जीवनशैलीचे, तामझाम आणि छुप्या मगरुरीचे निकष पहिल्यांदा उतरवून ठेवले ते टाटा कुटुंबाने! अर्थात, टाटांसारखी मोजकी अभिजात कुटुंबे खानदानी रईस! नारायण आणि सुधा मूर्ती हे दोघेही कनिष्ठ मध्यमवर्गीय. प्रणयाराधनाच्या काळात दोघांसाठी दोन कॉफी ऑर्डर करणेही ज्यांना परवडत नसे असे जोडपे. त्यांनी इन्फोसिसचा पसारा मांडला तो प्रचंड वेगाने बदलत्या काळातली बौद्धिक आव्हाने अंगावर घेण्याची प्रचंड जिजीविषा अंगी होती म्हणून! काळाने साथ दिली म्हणूनही! त्यातून कंपनी उभी राहिली. त्या उलाढालीतून कधी कल्पनाही केली नव्हती असा पैसा आला!

- पैसा आला, मागोमाग ‘स्थान’ आले, ‘जागतिक प्रतिष्ठा’ आली; पण यातले काहीही मूर्ती दाम्पत्याला ‘चिकटू’ शकले नाही, याचे कारण त्या दोघांनी जिवापाड जपलेली आणि कल्पनेपल्याड आर्थिक ऐपत बदलत गेली तरी सहजतेने कायम राखलेली जीवनमूल्ये! भारतातील नव-मध्यमवर्गाच्या यशाच्या कहाण्या पहिल्या नवलाईने सांगितल्या जात तेव्हा नारायण मूर्ती इन्फोसिसच्या कॅफेटेरियामध्ये लंच अवर सुरू असताना इतर कर्मचाऱ्यांच्या रांगेत कसे आपले ताट घेऊन शांतपणे उभे असतात, अब्जाधीश असूनही छोट्या जुन्याच घरात राहतात, त्यांच्या घरी नोकरचाकर नाहीत, सुधा मूर्ती वर्षातून दोनच साड्या कशा घेतात याचे वर्णन केले जात असे. नंतर सुधा मूर्ती यांनी अचानक आयुष्यात आलेल्या पैशाबरोबरचे आपले नाते आपण कसे विचारपूर्वक बांधत नेले याबाबत विस्ताराने लिहिलेही.

आपण मध्यमवर्गात वाढलो; पण आपली मुले समृद्धीत वाढत होती, त्या वाढीच्या वयात त्यांना श्रमाचे मूल्य समजावे, म्हणून आपल्याला कसे झगडावे लागले, याहीबद्दल सुधाताई सतत मोकळेपणाने बोलत असतात. पुढे ‘इन्फोसिस फाउण्डेशन’ स्थापन करून त्यांनी आपल्या कमाईतला मोठा हिस्सा समाजोपयोगी कामांकडेच वळवला. हे जोडपे त्या अर्थाने जागतिकीकरणोत्तर भारताचे ‘कॉन्शस कीपर’ आहे असेच म्हटले पाहिजे; पण दुर्दैव हे की, मूर्ती दाम्पत्यासारख्यांनी ‘निर्माण केलेल्या’ संपत्तीतला आपला वाटा उचलायला जीवतोड कष्ट केलेल्या भारतीय मध्यमवर्गाने त्यांची मूल्ये मात्र समाजमाध्यमात कौतुकाच्या पोस्टी पाडण्यापुरतीच वापरली! नाहीतर घरात आलेल्या पैशाआधी मनात शिरलेली उपभोगाची हाव, मगरुरी आणि बेफिकीर अप्पलपोटेपणा हा भारतीय नवमध्यमवर्गाचा

स्वभाव बनता ना! फोटो जुना का असेना, भाजीच्या गराड्यात बसलेल्या सुधाताईंच्या डोळ्यांतले निखळ, निर्भर सुख आपण कुठे गमावले, हे शोधायचे तर हा हिशेब मांडावा लागेलच!

– साभार, दै. लोकमत

❧

## ‘फेसाटी’कार नवनाथ गोरेंना भारती विद्यापीठ देणार नोकरी

लेखक नवनाथ गोरे यांना देशातील प्रतिष्ठेच्या साहित्य अकादमी पुरस्काराने पुरस्कृत करण्यात आले होते. अशा लेखकालाही प्रचंड हलाखीच्या परिस्थितीला सामोरे जावे लागत असल्याची बातमी विविध वृत्तपत्रांमधून झळकली. एका लेखकावर अशी वेळ येणं मराठी साहित्य क्षेत्रासाठी दुर्दैवी आहे; पण नवनाथ गोरे यांच्या वृत्तानंतर त्यांच्याकडे आलेला मदतीचा ओघही सकारात्मकतेचा संदेश देणारा आहे.

‘उत्तम दर्जाचे पुस्तक जन्माला घातलेला लेखक शेतमजुरी करतोय’ या ‘सकाळ’मधील बातमीने राज्यातील संवेदनशील, साहित्यप्रिय माणसाला वेदना झाल्या. त्यांनी या लेखकासाठी मदतीचा हात पुढे केला. ‘मला उचलून पैसे नकोत. मला नोकरी हवी आहे.’ असे सांगत नवनाथ गोरे नावाच्या या लेखकाने ‘मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा’चे दर्शन घडवले. भारती विद्यापीठाचे कार्यवाह, राज्याचे कृषी राज्यमंत्री यांनी तत्काळ या लेखकाला भारती विद्यापीठात नोकरी द्यायची ग्वाही दिली. संघर्षाने काळवंडलेला नवनाथ यांचा चेहरा या बातमीने फुलला.

निगडी बुद्रुक (ता. जत) येथील नवनाथ गोरे हे एम.ए., बी.एड. झालेले तरुण. त्यांनी स्वत:च्या जीवनप्रवासाची शब्दमाळ गुंफली आणि ‘फेसाटी’ नावाने ती पुस्तकरूपाने जन्माला घातली. त्यांच्या या पहिल्याच पुस्तकाने छाप उमटवत साहित्य अकादमीचा युवा साहित्यिक पुरस्कार जिंकला. हा पुरस्कार खूप मानाचा समजला जातो. शिरपेचातील तुरा... पण या तुऱ्यापुढे नवनाथ यांचे हात रिकामेच. भाकरीसाठीचा संघर्ष तो काही चुकला नाही. त्यांना पुरस्कार मिळाल्यानंतर काही ठिकाणांहून मदत



मिळाली. नगरमध्ये हंगामी नोकरीही मिळाली; मात्र कोरोनामुळे ती गेली. संकट गडद झाले. हातातोंडाची गाठ पडेना झाल्यावर नवनाथ यांनी शेतमजुरी सुरू केली. ही धक्कादायक, वेदनादायक बातमी 'सकाळ'ने प्रसिद्ध केली. ती महाराष्ट्रभर साहित्यवर्तुळात चर्चेचा विषय बनली. अनेकांनी नवनाथ यांचा संपर्क मिळवून मदतीसाठी हात पुढे केला. त्यावेळी नवनाथ यांनी, "मी घर चालवतोय, चाललय माझं ठीक. मला असे उचलून पैसे नकोत. ते काही कडेला जाणार नाहीत. मला नोकरी हवी आहे, ती मिळाली तर बरं होईल." अशी विनंती केली. खानदेश विचारमंचने मदत देण्याची घोषणा केली आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याशी चर्चा करून त्यांचे कार्यकर्ते भरीव मदत करणार आहेत. त्यांना हवी ती नोकरी भारती विद्यापीठाने देण्याचे ठरविले आहे. जतचे आमदार विक्रम सावंत यांनी या विषयावर श्री. विश्वजीत कदम यांच्याशी चर्चा केली. त्यावर आता शिक्कामोर्तब झाले.

– साभार, दै. सकाळ

✦





नवं कोरं

२०१९ ने दिली महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी

# ३५ दिवस

## महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारं महानाट्य




राजकीय

Book Available

**जीतेंद्र दीक्षित**


अनुवाद : पराग पोतदार


किंमत : ३३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध


श्रद्धांजली

## जसवंत सिंग

माजी अर्थ, परराष्ट्र आणि संरक्षणमंत्री जसवंत सिंग यांचं २७ सप्टेंबर रोजी निधन झालं. ते ८२ वर्षांचे होते. प्रथम भारतीय जनसंघ आणि नंतर भारतीय जनता पक्षाचे प्रमुख नेते व संसदपटू म्हणून ते ओळखले जात; मात्र राजकीय जीवनाच्या अखेरच्या टप्प्यात भाजपशी त्यांचे मतभेद झाले आणि त्यांना भाजपतून बाहेर पडावं लागलं.





मेहता पब्लिशिंग हाऊसने जसवंत सिंग यांची 'ए कॉल टू ऑनर : उगवत्या भारताच्या जयजयकारासाठी साद' आणि 'जिना : हिंदुस्थान-फाळणी-स्वातंत्र्य' ही पुस्तकं अनुवादित स्वरूपात प्रकाशित केली आहेत.

जसवंत सिंग यांना मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुकसेलर्स तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

## माधव कोंडविलकर



साहित्य विश्वात नवा प्रवाह निर्माण करणारे ज्येष्ठ लेखक माधव कोंडविलकर यांचे १२ सप्टेंबरला रत्नागिरी येथे निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. माधव कोंडविलकर यांनी मुंबई आणि कोकणातील पीडित, कामगार वर्गाची होरपळ लेखनातून तीव्रपणे मांडली. 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' ही त्यांची गाजलेली कादंबरी होय. दलित आत्मचरित्रात्मक कादंबरी म्हणून 'देवाचे गोठणे'ला गौरवाचे स्थान लाभले.

'अजून उजाडायचं आहे', 'एक होती कातळवाडी' इ. कादंबऱ्या, स्वामी स्वरूपानंद (आध्यात्मिक), हाताची घडी तोंडावर बोट, देवदासी, कोंगवन (शोधग्रंथ), छान छान गोष्टी (बालवाङ्मय) इ.साहित्य संपदा त्यांच्या नावावर आहे.

माधव कोंडविलकर यांना मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुकसेलर्स तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

✦

बो लू म रा ठी कौ तु के

# गंमत अर्थछटांची

*भाषा म्हणजे गावोगावचं पाणी बरोबर घेऊन वाहणारी खळाळती नदी. गावकुस ओलांडले की काही शब्द सीमेजवळ अडून बसतात, तर काही नव्याने प्रवाहात सामील होतात. मराठीच्या प्रवाहातले असे असंख्य शब्द आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. अशा शब्दांची उजळणी करण्याचा हा छोटासा प्रयत्न....*

| | | |
|---|---|---|
| अईन | – | चांगली कुळी; चांगली वर्तणूक, शिष्टाचारयुक्त किंवा रुबाबदार वर्तन. |
| अईसभईस | – | अद्‌भुत (गोष्ट). |
| अउडबारा | – | (अउड = औट म्हणजे साडेतीन. साडेतीन हात म्हणजे एक पुरुष उंचीचे माप. यावरून ) बारा पुरुष |
| अउणापाउणा | – | अर्ध्याने किंवा पावाने कमीअधिक, साधारणपणे संख्येच्या संदर्भात उपयोग केला जातो. |
| अउले | – | प्रेमाचे बोलावणे. |
| अउड | – | नांगर; औत. |
| अक | – | दु:ख; पाप. |


| | | |
|---|---|---|
| अकचाट | – | अतिकारस्थानी |
| अकच्छ | – | कासोटा न घालता नेसलेले धोतर, लुगडे इ. |
| अकट | – | विशेष चिकित्सा करणारा; हट्टी. |
| अकटचिकट | – | विशेष चिकित्सा करणारा; बारीकसारीक तपशिलात शिरणारा, आग्रही; हट्टी; चिकट; चेंगट. |
| अकटी | – | लहान शेगडी; आगटी; शेकोटी. |
| अकटेदुकटे | – | ठिकरीचा खेळ. |
| अकटोविकट | – | प्रचंड; फार मोठा व ओबडधोबड; अवाढव्य, बेढब, अगडबंब, अक्राळविक्राळ, भयप्रद, भयानक. |
| अकडकडवे | – | गाण्यातील पालुपद, ध्रुवपद, आंकणकडवे. |
| अकडणे | – | ऐट करणे; डौल मिरवणे; नखरा करणे. |
| अकडबाज | – | ऐटबाज; गर्विष्ठ. |
| अकडंतिकडं | – | वायफळ बडबड, टाळाटाळ, चुकवाचुकवी. |
| अकडाई | – | ऐट करण्याची सवय; नखरेलपणा. |
| अकढा | – | पूर्णपणे न कढलेला किंवा कढविलेला पदार्थ,वितळेपर्यंत न तापवलेला धातू. |
| अकण | – | कणी नसलेला स्वच्छ तांदूळ, दाणे नसलेले कणीस. खायला एक कणही नाही असा, दरिद्री. |
| अकणनिकण | – | एकदा मळून धान्य काढलेली कणसे पुन्हा मळून त्यातून निघालेले धान्य : ('अकणनिकण कालवून धान्य त्याच्या माथी मारावयाचे') |
| अकथ्या | – | कथापुराण न सांगणारा माणूस; पोथी न वाचणारा माणूस |
| अकद | – | स्थूल, लठ्ठ, बेडौल |
| अकदस | – | अत्यंत पवित्र; पुण्यवान; पुण्यशील |
| अकनिष्ठ | – | गौतम बुद्धाचे एक नाव, बौद्ध देवतांचा एक वर्ग. |

✦

**चर्चेतील पुस्तक**

फेसबुकवर विविध वाचक गटांमध्ये पुस्तकांसंबंधीच्या लक्षणीय चर्चा अनुभवायला मिळतात. इथे अनेक वाचक आपले वाचनानुभव व्यक्त करतात. अशा चर्चांमध्ये अधोरेखित झालेली ही काही परीक्षणे...

## शांताराम




लॉकडाउनच्या पार्श्वभूमीवर पुण्यावरून गावाकडे निघत असताना माहीत होतं की हा मोठ्ठा टप्पा, त्यात घरातून काम (वर्क फ्रॉम होम), त्यात आमच्या सिटीबँकेच्या रामनवमी, पाडवा, महावीरजयंती या आणि अशा बऱ्याच सणांच्या सुट्ट्यांमुळे महिनाभरात जवळपास फक्त १०-१२ दिवस ऑफिस. घराबाहेर कोरोना. त्यात वडील मोबाइलमध्ये जास्त डोकं घालू देत नाहीत. तर घरात हा इतका वेळ घालवायचा तर पुस्तकच पाहिजे, तेही तितक्याच तोलामोलाचं. खिळवून ठेवणारं. मागे जवळपास सहा महिन्यांपूर्वी अविनाश धर्माधिकारी सरांनी 'शांताराम'च्या अपर्णा वेलणकर यांनी केलेल्या मराठी अनुवादाचा उल्लेख केला होता. सरांनी सांगितलं म्हणून मागवलं पुस्तक. पुस्तक १४०० पानांचं, म्हणून वाचायची ताकद झाली नाही कधी. फक्त घरातल्या बुक शेल्फची शोभा वाढवत होतं; पण या अशा मोकळ्या आणि निवांत वेळेसाठी पुस्तक कोणतं घ्यायचं, लागलीच 'शांताराम' डोक्यात आलं, म्हणून गावाकडे निघताना उचललं आणि टाकलं गाडीत. तर 'शांताराम' लिहिलंय ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स यांनी. हो लेखक


विदेशी आहे, ऑस्ट्रेलियाचा. मागे पाचएक वर्षांखाली 'शांताराम'ची मूळ इंग्रजी आवृत्ती वाचलीय. त्यावेळेस उद्देश होता इंग्रजी वाचून इंग्रजी सुधारण्याचा. खरंच फरक पडला. एकाच पुस्तकात थरार आहे, रोमान्स आहे, साहस- ॲडव्हेंचर तर आहेच. सोबत आहे तत्त्वज्ञान, तेही तुम्हाआम्हाला रुचेल, आवडेल, पटेल अशा भाषेत. त्यामुळे पुस्तकाचा जॉनर- शैली सांगणं अवघड. असो. 'डेव्हिड' कथेचा नायक, स्वतः लेखक - जेमतेम विशीतला. सशस्त्र दरोड्याच्या गंभीर आरोपाखाली वीस वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झालेला, ऑस्ट्रेलियातील तुरुंग फोडून पळाला, ऑस्ट्रेलियाचा 'मोस्ट वॉन्टेड मॅन' ज्याचं नाव इंटरपोलच्या यादीतही आहे. न्यूझीलंडमार्गे लिंडसे नावाने बनवलेल्या बनावट कागदपत्राद्वारे सत्तरीच्या दशकात मुंबईत येतो. आणि पुस्तकाच्या पहिल्या पानापासून थरारक कहाणी सुरू होते. 'लिंडसे' मुंबईत पाऊल टाकतो आणि या शहराच्या प्रेमात पडतो. मुंबईत आल्या आल्या गाईड म्हणून प्रभाकर ऊर्फ प्रभू त्याला भेटतो, नंतर तो त्याचा एकदम जवळचा मित्रही होतो. प्रभाकर लिंडसेला 'लिन' असं नाव देतो. कार्लासारखी मैत्रीण भेटते. सोबत डीडीयर, उल्ला, मोदेना या पात्रांभोवती कथा फिरत राहते. कार्लाच्या एकतर्फी प्रेमात पडतो. गाईड प्रभूचं काम असतं मुंबईची ओळख करून देणं, इथली चालचलन शिकवणं. प्रभूही एकदम हाडाचा गाईड, तो शहरातल्या वैध-अवैध गोष्टी कशा चालतात याची एकापाठोपाठ रोज एका ठिकाणी घेऊन जाऊन माहिती देतो. त्याला मराठी शिकवतो. हिंदीसुद्धा. प्रभू, लिनला मुंबई सोडून खरा भारत कसा आहे हे दाखवायला जळगाव जिल्ह्यातल्या त्याच्या गावी घेऊन जातो. लिनच्या नजरेतून गावाची संस्कृती वाचायला मजा येते. लिनसाठी भारतीय पद्धतीने तांब्याने बकेटातील पाणी खांद्यावर घेऊन अंघोळ करायचा अनुभव-सुद्धा एकदम नवीन असतो. 'पिके' चित्रपटातील परग्रहावरून आलेल्या पिकेप्रमाणे लिनबाबाची अवस्था असते. परत मुंबई. परत कार्ला, उल्ला, डीडीयर, मोदेना आणि अशी इतर पात्रं येत राहतात, आणि पुढे अंडरवर्ल्डचा थरार, वेश्याव्यवसाय, ड्रग्स हे सर्व चालू असतंच; पण मुळात 'शांताराम'मध्ये आहे प्रेम. प्रेम- दोन मित्रातलं, प्रेम- इथल्या लोकांवरचं, प्रेम-मुंबई शहरावरचं, भारतीय संस्कृतीवरचं. इथल्या भाषेवरचं. मग त्याला इतकं सगळं इथलं आवडलंय तर लिन परत ऑस्ट्रेलियाला जातो का? तो

इतक्या मोठ्या बेस्ट सेलर पुस्तकाचा लेखक झाल्यावर त्याला त्याचा देश स्वीकारतो का? की राहतो इथेच आपल्या देशात. याची उत्कंठा शेवटपर्यंत असतेच; पण त्यासोबत आणखीन एक प्रश्न पूर्ण पुस्तक वाचत असताना सतत आपल्या डोक्यात असतो, पुस्तकाचं नाव 'शांताराम' कशामुळे? कारण एकही पात्र नाहीये ज्याचं नाव शांताराम आहे. त्याचं उत्तर मिळतं पुस्तकाच्या मध्यात. एक मात्र नक्की. 'शांताराम' हातात घेतला की खाली ठेववत नाही. खिळवून ठेवतो. वाचनीय आणि संग्राह्य असं पुस्तक.

**– श्रीप्रसाद कुलकर्णी**

❧

## कोमा





सत्तरच्या दशकातली ही कथा आहे. बोस्टन शहरातील 'मेमोरियल' हे एक प्रतिष्ठित व भव्य रुग्णालय. दरवर्षीप्रमाणे त्यावर्षीसुद्धा मेडिकलच्या पाच विद्यार्थ्यांचा एक समूह तिथे प्रशिक्षणासाठी येतो. त्यातलीच एक म्हणजे कथेची नायिका - सुसान. तिथे तिला अज्ञात व रहस्यमय कारणाने कोमात गेलेल्या रुग्णांच्या काही केसेस पाहायला मिळतात. बुद्धिमान सुसान तशी अभ्यासू असल्यामुळे, तसेच काही रुग्णांबद्दल वाटणाऱ्या सहानुभूतीमुळे तिच्या मनात अशा अज्ञात कारणाने कोमात जाणाऱ्या रुग्णांच्या केसेसबद्दल कुतूहल निर्माण होतं. आणि मग ती त्या प्रकरणांचा छडा लावायचा कसा प्रयत्न करते, तिला कोणकोणते अडथळे येतात आणि शेवटी भीषण वास्तव कसं समोर येतं ते सांगणारी ही रंजक कथा. कथेतील बरेच प्रसंग हे थरारक आहेत. अनुवाद नेहमीप्रमाणे उत्तम. एकदा नक्कीच वाचण्यासारखी कादंबरी.

**– सुमीत देशमुख**

❧

## माय फॅमिली इज ऑल आय हॅव




खूप दिवसांनी पुस्तकाकडे वळले. दिवसभर लॅपटॉपच्या स्क्रीनकडे बघून डोळे नुसते भकभकून गेले होते. आणि नेमका तेव्हाच वाचनालय चालू झाल्याचा मेसेज आला. त्यामुळे लगोलग गेले आणि फार वेळ न घालवता जे हाताला लागले ते पुस्तक घेऊन आले. वाचताना अनेक वेळा बाजूला ठेवले, दुसरे महायुद्ध म्हटले की नाझी आणि त्यांच्या छळ छावण्या, त्यातून बचावले गेलेले नशीबवान यांची चरित्रेच काय ती आपल्याला ठाऊक; पण या युद्धाच्या सावलीचेसुद्धा किती भयानक परिणाम आजूबाजूला होत होते, हे हे पुस्तक वाचताना अगदी प्रकर्षाने जाणवते. ती जेव्हा इंग्लंडला पोहोचली तेव्हा माझेच डोळे वाहत होते... खूप बरे झाले मी हे पुस्तक वाचले. आपण लॉकडाउनमुळे निदान घरात, खाऊनपिऊन सुखी आणि सुरक्षित आहोत हे काय कमी आहे, याची तीव्र जाणीव झाली हे पुस्तक वाचून. शिवाय, लॅपटॉपच्या अतीव व अपर्यायी वापराने कोरडे पडलेले डोळे या पुस्तकाने ओले नक्कीच केले.

**– टेका कुलकर्णी**

❧

## ययाति




वासनेचा आधार घेऊन प्रत्येकातल्या ययातीच्या कानशिलाखाली लगावण्याचं काम ही कादंबरी करते. वासना आणि मोह एका मर्यादेपलीकडे गेले की त्याने येणारं आंधळेपण आपल्याकडून काय काय घडवून आणू शकतं याचं उत्तम दर्शन घडवणारी ही कादंबरी प्रत्येकाने वाचावी अशीच आहे. ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेली ही कादंबरी वि.स.खांडेकर यांच्या अजोड लेखणीचं

उत्तम उदाहरण आहे.

**– संकेत चिंचखेडे**

❧

## स्वामी




पेशवाईचा समानार्थी शब्द काय, या प्रश्नाचं हमखास उत्तर आजही बऱ्याच अंशी 'रुबाब' असं दिलं जाईल. ही कादंबरी अशाच एका पेशव्याची कहाणी सांगते. सत्ताधाऱ्यांचा सगळ्यात मोठा संघर्ष आपल्याच माणसांशी असतो हे या कादंबरीवरून लक्षात येतं. प्रत्येक सत्ताधाऱ्याच्या कारकिर्दीचं मूल्यमापन त्याने किती सत्ता कमावली यावरून करता येत नाही, हे कादंबरी वाचल्यावर कळतं. काहींची श्रेष्ठता त्यांनी कमावल्यापेक्षा वाचवलेल्या सत्तेत असते ही जाणीव आपल्याला होते. आलंकारिकतेपेक्षा वास्तविकतेत ज्यांना रस आहे त्यांनी ही कादंबरी वाचावीच!

**– संकेत चिंचखेडे**

❧

## टू सर, विथ लव्ह



ही एका कृष्णवर्णीय इंग्लिश शिक्षकाची मि. ब्रेथवेट यांनी स्वतः सांगितलेली कहाणी. रॉयल एअरफोर्समधील यशस्वी कारकीर्द संपवून ते जेव्हा नोकरीसाठी अर्ज करत होते तेव्हा त्यांना खरी वर्णद्वेषाची ओळख झाली. वरवर सहानुभूती दाखवून शेवटी नकारघंटाच पदरात पडायला सुरुवात होते. ग्रीनस्लेड शाळेत त्यांना शिक्षक म्हणून रुजू व्हायची संधी मिळाली. या शाळेत समाजाच्या खालच्या आर्थिक स्तरातील मुलेच

प्रवेश घ्यायची. सर्व बेशिस्त व कसलाही विधिनिषेध नसलेली, संस्कारहीन. ब्रेथवेट यांनी अपार कष्ट घेऊन आपली योग्यता कशी सिद्ध केली, हे अगदी हृदयाला भिडणारे आहे.

**– अनिल उदगीरकर**

❧

## मुक्त विहंग चीनच्या तीन कन्या




चीनच्या त्या जगप्रसिद्ध भिंतीमागे काय चालू आहे याची उत्सुकता सगळ्यांनाच असते. तेथे असलेली कम्युनिस्ट राजवट, राजकारण याची माहिती सर्वांनाच हवी असते. या पुस्तकात लेखिका, तिची आई आणि आजी अशा तीन स्त्रियांची वेगवेगळ्या कालखंडातली कहाणी सांगितली आहे. चीनमधल्या जुलमी राजवटीची, अमानुष क्रौर्याची आणि क्रांतीची कहाणी आहे. या क्रांतीमुळे चिनी जनतेवर झालेले परिणाम, श्रीमंत-गरीब लोकांचे जीवन, त्यांचे राहणीमान अतिशय सुंदर पद्धतीने मांडण्यात आले आहे. या पुस्तकास चीनमध्ये बंदी घातली आहे. पुस्तकाचे मूळ नाव 'वाइल्ड स्वान्स थ्री डॉटर्स ऑफ चायना' हे आहे. यातील अमानुष हिंसाचार वाचून अंगावर काटा येतो.

**– किरण बोरकर**

❧

## माणदेशी माणसं

'माणदेशी माणसं' हा व्यंकटेश माडगूळकरांचा सर्वांत पहिला कथासंग्रह. माणदेशातल्या साध्या, सरळ आणि कष्टकरी माणसांची ही शब्दचित्रं इतकी हुबेहूब आणि सुंदररीत्या रंगवली आहेत, की वाचताना ती आपल्यासमोर उभी राहतात. अगदी आजही. आता हा 'झेल्या'च बघा. 'बटन नसलेल्या कुडत्याला एक हातानं गळ्याशी धरून झेल्या बिथरल्या




खोंडासारखा उभा होता. अंगानं किरकोळच. वयानंही फारसा नसावा. तेरा-चौदा एवढा. डोक्याला मळकट अशी पांढरी टोपी. अंगात कसले कसले डाग पडलेलं, मळलेलं, बाहीवर ठिगळ लावलेलं हातमागाच्या कापडाचं कुडतं; त्याला शोभेलशीच तांबड्या रंगाची चौकडी असलेली गादीपाटाची चड्डी! तिचे दोन्ही अंगचे खिसे फुगलेले. त्यांत बहुधा चिंचा भरलेल्या असाव्यात.' आधीच्या मारकुट्या मास्तरांनी हिरवेनिळे वळ उठेपर्यंत मारल्यामुळे शाळेकडे न फिरकणारा व नवीन मास्तरांच्या प्रेमळ वागणुकीवर खुश होऊन नियमित शाळेत येणारा आणि त्यांना जीव लावणारा झेल्या किती सुंदर रेखाटला आहे. माडगूळकरांनी फक्त मानवी स्वभाव नाही तर त्या काळची सामाजिक परिस्थिती देखील उत्तम प्रकारे रेखाटली आहे. ती वाचताना कधी हसायला येतं, कधी राग येतो; तर कधी अजूनही परिस्थिती बदलली; पण प्रवृत्ती तशीच आहे, याचं वाईटही वाटतं. या माणदेशी माणसांची भाषा, राहणीमान, परिस्थितीचा बाऊ न करता तिला सामोरं जाणं, प्रामाणिकपणे कष्ट करणं आणि जगण्याची उमेद कायम ठेवणं अशा कितीतरी गोष्टींमुळे या व्यक्तिरेखा इतक्या वर्षांनंतरही आपल्याला आकर्षित करतात. शनिवार-रविवार घरी जाऊन आठवड्याभरासाठी भाकरी घेऊन येणाऱ्या 'नामा' मास्तराबद्दल लेखक लिहितात, 'खाण्यापिण्याचे हाल होतात म्हणून कुरकुरायला नामा पांढरपेशा थोडीच होता! जेवणाचे जास्त चोचले करायचं त्याला माहीत नसावं.' किंवा एकटीच राहणारी, कुंकू-दातवण विकून जगणारी, कधी पडले तर तांब्याभर पाणी द्यायला कोणी नाही असं सांगणारी तांबोळ्याची 'खाला' ही म्हातारी लेखकाला सांगते , 'अरे गोडीगुलाबीने राहावं. चार माणसं आपली करावीत. भलेपणा मिळवावा. दुसरं काय मिळवायचं हतं?' परिस्थिती चांगली नाही म्हणून सोडून गेलेल्या बायकोबद्दल, 'मी न्हाई केली वासपूस! आपल्याजवळ ऱ्हान्याची तिची जर विच्छा न्हाई, तर कशाला जोरा करायचा? जाऊदेल म्हणालो, कुटंबी सुकात असली म्हंजे झालं!' असं बोलणारा आणि शिक्षण नसल्याने आपली ही

स्थिती आहे, हे जाणून भाच्याला खूप शिकवण्यासाठी कष्ट करणारा रामा मैलकुली. आपल्या पुतण्याला नवीन कोट, खाऊ देण्यासाठी, त्याला एकदा बघण्यासाठी; साठ ते पासष्ट मैलांचे अंतर पायी तुडवून आलेले आणि भेट झाल्यावर पुन्हा आले तसे परत चालत नोकरीवर रुजू होण्यासाठी गेलेल्या बिटाकाकांचं प्रेम पाहून खरंच आश्चर्य वाटतं. तालुक्यात देवीची साथ आल्यामुळे मुलाला लस टोचण्याचा पत्र पाठवून आग्रह करणारे देशपांडे मास्तर आणि त्यांना 'मी, माझा बाप, माझा आजा कोणीही टोचून घेतले नाही तरी आमच्यापैकी कुणीही साथीच्या रोगाने मेले नाही. सबब, माझा मुलगाही मरणार नाही. मी त्याचा बाप तो जास्त कसा जगेल हे बघीन. तुम्ही फक्त त्याला चार अक्षरे शिकवण्याचे करा.' असं सांगणारे वडील. या दोघांमध्ये शाळा सुटेल या भीतीने अडकलेला मुलगा आणि 'शाळा शिकायची, तर सगळं सोसलं पाहिजे बाबा. मास्तर म्हणतात ते केलं पाहिजे.' असं म्हणत लस टोचायला नेणारी अशिक्षित आई. वरवर पाहता या व्यक्तिरेखा गरिबीने वेढलेल्या आणि दारिद्र्याने पिचलेल्या वाटतात; पण जगण्याचं साधं, सोपं तत्त्वज्ञान आपल्याला शिकवतात आणि जगण्याची उमेद देतात. १९४९मध्ये या पुस्तकाची प्रथम आवृत्ती निघाली. स्वातंत्र्यानंतर मराठी साहित्यात जे अक्षर-ग्रंथ निर्माण झाले, त्यात 'माणदेशी माणसं'चा समावेश होतो. त्यातील व्यक्तिरेखांतून त्यांनी ग्रामीण माणसाचे जे अस्सल आणि जिवंत दर्शन घडविले, ते तोवरच्या मराठी सहित्याला अनोखे होते. मला तर हे वाचून आश्चर्य वाटलेलं, की हे पुस्तक प्रकाशित झालं तेव्हा माडगूळकर फक्त २१-२२ वर्षांचे होते. तसं कल्पकतेला वयाचं बंधन नसतंच; पण व्यंकटेश माडगूळकरांचं फारसं शिक्षण नसतानाही त्या वयातील प्रतिभा, कल्पनाशक्ती, निरीक्षणशक्ती खरंच अवाक् करणारीच आहे. आणि या प्रतिभेतूनच आकाराला आलेल्या या १६ व्यक्तिरेखा. एकदा तरी नक्की वाचा. त्यांच्या दुःखामुळे थोडेसे अस्वस्थ व्हाल; पण कधी निराश असताना त्यातील कोणीतरी एक आठवेल, तुमच्या चांगल्या परिस्थितीची जाण करून देईल आणि पुढे जायला प्रेरणा देईल.


**– अश्विनी सुर्वे**

अ
भि
प्रा
य

## बीइंग मॉर्टल

### रुग्ण-स्वास्थ्याचे सखोल चिंतन...

जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला मृत्यू येणारच हे त्रिकालबाधित सत्य असले, तरीही कोणीही हे वास्तव सहज स्वीकारत नाही. जीवनाचा अंतिम क्षण जवळ आलेला रुग्णदेखील, व्याधिमुक्त होण्यासाठी विविध उपचार करवून घेत असतो आणि जगण्याची धडपड करीत असतो. अशाच असाध्य व्याधी जडलेल्या रुग्णांवर त्यांच्या मृत्यूच्या क्षणापर्यंत केले जाणारे उपचार, रुग्णाची मानसिक स्थिती, त्यांच्या कुटुंबीयांची मानसिकता आणि त्यांचे अनुभव कसे असू शकतात, याची माहिती वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी डॉ. अतुल गवांदे यांनी 'बीइंग मॉर्टल' हे इंग्रजी पुस्तक लिहिले आहे. त्याचा मराठी अनुवाद डॉ. वसु भारद्वाज यांनी केला आहे. डॉक्टर गवांदे यांनी या पुस्तकातून अनेक प्रकारच्या व्याधींनी ग्रस्त असलेल्या रुग्णांची माहिती करून दिली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर विज्ञानाने अनेक शोध लावले. वैद्यकीय क्षेत्रात नवनवीन औषधांची निर्मिती करण्यात आली आणि रुग्णालये ही आरोग्य केंद्रं बनली. विदेशातील वृद्ध रुग्णांना शुश्रूषागृहात ठेवण्यात येऊ लागले. अशा रुग्णालयात ठेवण्यात आलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील, वेगवेगळ्या सामाजिक स्तरांतील आणि वेगवेगळ्या व्याधींनी ग्रस्त असलेल्या अनेक रुग्णांवर, डॉ. गवांदे यांनी





उपचार केले, तेव्हा केलेल्या निरीक्षणातून हे पुस्तक आकाराला आले आहे. रुग्णांवर उपचार करताना काही मर्यादा असतात आणि मरणाच्या दारात असलेल्या रुग्णांकडे असहायपणे पाहण्यापलीकडे डॉक्टर काहीच करू शकत नाही, अशी कबुली डॉक्टरांनी येथे दिली आहे. कोणत्याही व्यक्तीला जडलेल्या व्याधी, त्यावरील उपचार आणि मृत्यू या अनुषंगाने येणाऱ्या अन्य बाबी याबाबत अनेक तत्त्वज्ञ, विचारवंत, लेखक आणि अभ्यासक यांनी वेगवेगळ्या प्रकारे कसे भाष्य केले आहे, याची माहिती देताना टॉलस्टॉय, कार्स्टेन्सेन, शेर्विन न्युलँड, जोसी रॉयसी अशा अनेक विचारवंतांनी या विषयावर मांडलेले विचार, त्यांचे भाष्य, त्यांचा अभ्यास आणि त्यांच्या निरीक्षणांचीही माहिती करून दिली आहे. गंभीर स्वरूपाच्या व्याधींवर उपचार करून घेत असलेल्या आणि जीवनाच्या अंतिम टप्प्यात असलेल्या रुग्णांना आपल्या संस्कृतीत जगण्याचे उद्दिष्ट विचारले जात नाही. विदेशात मात्र डॉक्टर गवांदे यांच्याकडे उपचार घेत असलेल्या रुग्णांना तसे विचारण्यात आले आहे. अखेर मरण येणारच आहे, तर हव्याहव्याशा गोष्टींमधून आनंद मिळवून, मृत्यूला हसतहसत सामोरे जावे, अशी भावना व्यक्त करणाऱ्या आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहणाऱ्या अनेक रुग्णांची माहिती येथे दिली आहे. कोणत्याही रुग्णावर केले जाणारे उपचार मर्यादित असतात, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन, रुग्णाच्या व्याधीकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहताना सामाजिक-कौटुंबिक मानसिकतेशी त्याचा संबंध जोडला आहे. रुग्णशय्येवरच्या रुग्णाला औषधोपचारांचीच गरज असते असे नाही, त्याचे मन आनंदी राहील अशा वातावरणाचीही गरज असते, हे या पुस्तकात पटवून दिले आहे. एका डॉक्टरने लिहिलेल्या पुस्तकाचा अनुवाद एका डॉक्टरने केल्यामुळे, या पुस्तकातील संपूर्ण विवेचन वाचकांसमोर अतिशय सुलभ पद्धतीने येते.

**-कमलाकर राऊत**

– महाराष्ट्र टाइम्स (६.९.२०२०)

✦

पुस्तकपरिचय




# भावनागुलो

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**तसलिमा नासरिन**

अनुवाद

**अपर्णा झा**

## समकालीन वास्तवाचा आरसा...

'भाबनागुलो' अर्थात चिंताच चिंता. समाजातील अस्वस्थ करणाऱ्या घटनांचे संवेदनशील मनात उमटणारे पडसाद या पुस्तकात प्रतिबिंबित होतात. कविमनाच्या तसलिमा नासरिन नानाविध विषयांवर मुक्त चिंतन करतात. मुल्ला-मौलवीच्या फतव्यांमध्ये घुसमटणारं स्त्रीमन...मूलतत्त्ववादाच्या भोवऱ्यात अडकलेला राष्ट्रवाद...स्थलांतरातली अपरिहार्यता...अशा प्रश्नांची सल तसलिमा नासरिन यांना टोचणी देत राहते. त्यातून त्या अंतर्मुख करणारे प्रश्न विचारतात. त्यांच्या या अभिव्यक्तीतून जणू समकालीन वास्तवाचा आरसा आपल्यासमोर उभा ठाकतो. आणि सामाजिक चिंतांकडे अंगुलीनिर्देश करत राहतो.

या पुस्तकाचं स्वरूप तसं पाहता डायरीसारखं आहे; पण ही डायरी समकालीन घटनांचं वृत्तांकन करत त्यावरची विवेकी मतेही मांडते. विविध आणि वैविध्यपूर्ण लेखांतून तसलिमा नासरिन यांनी खूप म्हणजे खूपच विषयांवर मुक्त चिंतन करून स्वत:ची मतं अगदी मोकळेपणाने लोकांसमोर मांडलीत. यामध्ये स्त्रीस्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानाधिकार, आचारविचार आणि उच्चार स्वातंत्र्य, अंधश्रद्धा, धर्म आणि राजकारण, बलात्कार, सार्वजनिक ठिकाणची शिल्पे फोडणे, हटवणे, अरब इंडोनेशियातील शिल्पे, न्यायदेवतेचे शिल्प हटवणे, बांगलादेशच्या शेख हसीना आणि पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी, नरेंद्र मोदी, ट्रम्प आणि त्याची कुटिल नीती, ट्रम्पची स्त्रियांकडे पाहण्याची दृष्टी, त्यांनी सत्तेवर आल्यावर घेतलेले विचित्र निर्णय – व्हॅलेंटाइन डे, मेनोपॉज, करवा चौथ, सिंदूरखेला, बांगलादेश आणि भारतातून तसलिमाची हकालपट्टी व अपमान, घर न मिळणं, लेखिकेचं कुटुंब, तिचं एकाकी जीवन, तिच्या पुस्तकांवरील बंदी, तिच्याविषयीचे मुल्ला- मौलवींचे भयानक फतवे, कट्टरपंथी– हिंदू व मुस्लीम दोन्ही धर्मांतले, भारत सरकार आणि बांगलादेशी सरकारचं त्यांच्या बाबतीतलं पक्षपातित्व, जगात वाढत चाललेलं धर्मपालन, धर्मरक्षण, हिंदू-मुस्लीम तेढ, वर्णविद्वेष, जातीयता, रोहिंगे आणि सर्वांबरोबर पुन:पुन्हा येणारा विषय म्हणजे लेखिकेवर सर्व बाजूंनी होणारे (खोटे) दोषारोप, मायदेश किंवा भारत कुठेही थारा नसल्याचं अतीव दु:ख, पुरोगामी विचारवंत

दाभोळकर, पानसरे वगैरेंवरील हल्ले आणि खून इत्यादी अनेक अनेक विषयांवर तसलिमाचे विचार आणि परखड लेखन वाचल्यावर खरोखरच तिच्या बाबतीत जे घडलंय, घडतंय ते पाहून वाईट वाटतं.

प्रचंड छळ होऊनही, होत असूनही तसलिमाची सर्वत्र नजर आहे, चालू परिस्थितीचं त्यांना भान आणि ज्ञान आहे. नेमक्या कोणत्या कारणामुळे या बुद्धिमती स्त्रीवर सर्व प्रकारची बंदी घालण्यात आली आहे हे माहीत नाही; पण लोकशाही खऱ्या अर्थाने देशात असेल तर सर्वांना आचारविचार आणि उच्चार या बाबतीत स्वाधीनता, स्वातंत्र्य असायलाच हवं हे जे तिचं मत आहे, त्याच्याशी वस्तुत: कोणाचंही दुमत नसावं; पण तसलिमाच्या बाबतीत ते सर्व खोटं झालंय, ठरवलं गेलंय, असं तिचे हे लेख वाचल्यावर वाटतं आणि दु:ख वाटतं. तिने म्हटल्याप्रमाणे तिने खून, मारामारी, चोरी वगैरे घृणास्पद गुन्हे केलेले नसताना तिच्यावर पूर्ण पाबंदी का, हा प्रश्न मनात घोळत राहतो. पुन्हा एकदा सत्य कटू, सत्य हे अप्रियच असतं याची प्रचिती येते.

✦





**तसलिमा नासरिन यांची**
**आम्ही प्रकाशित केलेली पुस्तके**

लज्जा
फेरा
निर्बाचित कलाम
नष्ट मेयेर नष्ट गद्य
निर्बाचित कबिता
आमार मेयेबेला
उधाण वारा
द्विखंडित
फरासि प्रेमिक
भाबनागुलो
शोकोल ग्रिह हारालो जार

# हल्दिराम


**पवित्रा कुमार**

अनुवाद : **नीला चांदोरकर**




नमकीन पदार्थांच्या अस्सल चवीची खवय्यांना ओळख करून देणाऱ्या आणि एका छोट्या शहरातून जगव्यापी भुजिया साम्राज्य उभं करणाऱ्या हल्दिरामांची रंगतदार चरितगाथा

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# चर्चिलच्या पाऊलखुणा


**रिचर्ड होम्स**

अनुवाद : **अवधूत डोंगरे**

कधी कुंचल्यात... कधी शब्दांत... तर कधी मद्याच्या प्याल्यात स्वतःला हरवून टाकणारा... अभिमानानं लष्कराचा गणवेष मिरवणारा... दुसऱ्या महायुद्धाच्या महासंकटात बेरक्या राजकारणानं विजयश्री खेचून आणणारा धुरंधर... विन्स्टन चर्चिल यांच्या वादळी व्यक्तिमत्त्वाचा मार्मिक लेखाजोखा...

**किंमत : ५९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तक परिचय




# शोकोल ग्रिह हारालो जार

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**तसलिमा नासरिन**

अनुवाद

**मंजिरी धामणकर**

## निर्भय, प्रकट मुक्त चिंतन...

'पुरुषसत्ताक' कुटुंबपद्धतीचा जगभरातील बहुतांश स्त्रियांना सोसावा लागणारा त्रास, छळवणूक... प्रसंगी भोगावा लागणारा अत्याचार हा तसलिमा नासरिन यांच्या मनातील सल आहे. कट्टर धर्मांधांनी रूढी-परंपरांचा दाखला देत स्त्रियांना दुय्यम महत्त्व देऊन त्यांची पिळवणूक केली आहे. जगभरात प्रत्येक क्षेत्रात प्रगती होत आहे; मात्र पुरुषांच्या बरोबरीने आपली क्षमता सिद्ध करूनही स्त्रियांना कस्पटासमान लेखले जात आहे. याच विषयावर प्रस्तुत पुस्तकात निर्भीड आणि परखड शब्दांत तसलिमाने भाष्य केले आहे. मृत्यूची टांगती तलवार डोक्यावर असताना कट्टरतावाद्यांच्या धमकीला भीक न घालता, लेखणी हेच शस्त्र परजून तथाकथित वर्चस्ववादी पुरुषांना अंतर्मुख केले आहे.

अनंत अडचणींचा सामना करत, खुनाच्या धमक्या येऊनसुद्धा अंतरातल्या आवाजाला सतत प्रतिसाद देत, समाज- परिस्थितीशी तडजोड न करता; तळमळीने, निर्भयपणाने लिहिणारे जगभरात जे मोजके लेखक आहेत, त्यांतील एक अग्रगण्य नाव म्हणजे तसलिमा नासरीन. *'शोकोल ग्रिह हारालो जार'* – 'जिचे सगळे घरच हरवले'- हे पुस्तक उपरोक्त विधानाला पुष्टी देणारे असेच आहे.

या पुस्तकात तसलिमाने विविध विषयांचा परामर्श घेतला आहे. अगदी अमेरिकेच्या निवडणुकीपासून ते रोहिंग्यांच्या, संथाळांच्या जीवनापर्यंत आणि फिडेल कॅस्ट्रोच्या क्यूबापासून अंधश्रद्धांपर्यंत अनेक विषयांवर तिने पोटतिडकीने, निर्भयतेने रोखठोक शब्दांत स्वतःची मते मांडली आहेत. त्याचबरोबर स्वतःच्या आयुष्यातील अडचणी, अन्याय, एकाहत्तर सालच्या कटू आठवणी यांबद्दलही लिहिले आहे. 'धर्माच्या नावाखाली राजरोस खून करणारे, अतिरेकी कारवाया करणारे मोकाट फिरताहेत; आणि खून, मारामारी, फसवणूक असा कोणताही गुन्हा केलेला नसताना केवळ माझ्याच नव्हे तर सर्वांच्याच भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी लेखणी चालवणाऱ्या मला हद्दपारीची शिक्षा का?' हा तिचा बिनतोड सवाल अंतर्मुख करायला लावणारा आहे. या सर्व लिखाणात भाषण आणि अभिव्यक्ती

स्वातंत्र्याची मुस्कटदाबी, स्त्रियांवरचे अत्याचार, पुरुषप्रधान समाजाबद्दलची चीड, धर्माला वेठीला धरून स्वार्थ साधणारे, सारासार विवेकाला तिलांजली देऊन निर्दयपणे माणसे मारणारे अतिरेकी या विषयांवर अधिक जोर दिलेला जाणवतो. काही वेळा मुद्द्यांची पुनरावृत्तीदेखील आढळते. सर्व प्रकारची विषमता दूर होऊन सर्व जग म्हणजे एक एकसंध, सुसंस्कृत, मानवतावादी समाज घडावा, ही तळमळ हा तसलिमाच्या लिखाणाचा पाया आहे.

या पुस्तकाच्या अनुवादक मंजिरी धामणकर यांनी तसलिमाची कळकळ, व्यथा-वेदना... प्रसंगी जहाल वाटणारी मतं अतिशय समर्पक आणि संयमितपणे शब्दबद्ध केली आहेत. त्यांच्या अभिजात मराठी शैलीमुळे पुस्तक वाचनीय झाले आहे.

✦





**मोबाइलमध्ये बनवा समृद्ध लायब्ररी**
**ई-बुक्सचा खजिना आला तुमच्या दारी...**

**आपली लाडकी पुस्तकं... कधीही... कुठेही...**
**e-bookच्या रूपात**

**मराठीतल्या दिग्गज लेखकांपासून लिहित्या सर्जनांपर्यंत**
**हजारो पुस्तके एका क्लिकवर...**

## नवी संहिता... नवा आशय...

# हरित युद्धे





**बहार दत्त**

अनुवाद : **रवींद्र भगवते**

धरणांनी गिळलेली अरण्यं..खाणींनी गिळलेले डोंगर..औद्योगिक प्रकल्पांनी गिळलेले जलस्रोत..माणसानं स्वतःच्या जीवन स्रोतांविरोधातच पुकारलेल्या युद्धांचं अस्वस्थ करणारं चित्रण..पर्यावरण कार्यकर्त्या बहार दत्त यांनी मांडलेली वास्तवदर्शी हकिगत.

**किंमत : २५०/-रु.**
**पोस्टेज ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# छोट्या शहराचा दर्या





**अनीस सलिम**

अनुवाद : **सुनीता कट्टी**

स्थलांतरात झुरणारं... स्थलांतरात फुलणारं.. एका किशोरवयीन मुलाच्या आयुष्याचं जगणं चितारणारी साहित्य अकादमी विजेते अनीस सलिम यांची विलक्षण कादंबरी

**किंमत : २९५/-रु.**
**पोस्टेज ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तकपरिचय




# उदयन

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

राजेन्द्र खेर

## सौंदर्याविष्काराचा सुखद प्रत्यय

'कथासरित्सागर' या सोमदेव शर्मा यांनी रचलेल्या संस्कृत ग्रंथात उदयनकथा विस्ताराने कथन केली आहे. राजेन्द्र खेर यांनी उदयन-वासवदत्ता यांची हीच भावमधुर प्रेमकथा उत्कटतेने रंगवली आहे 'उदयन' या कादंबरीतून.

कलासक्त उदयन राजा हा वत्सदेशाचा राजा असतो. तो शूर आणि कुशल योद्धा असला तरी संगीतसाधनेत आणि विलासात जास्त रमत असतो. त्याचीच परिणती वत्सदेशाच्या पतनात होते. उदयन राजाचे अमात्य यौगंधरायण यांना ही गोष्ट अस्वस्थ करत असते. अशातच अवंतीनरेश प्रद्योत आपली रूपसुंदर कन्या वासवदत्ता हिला वीणावादन शिकविण्यासाठी उदयनला विनंती करतो. पण, उदयन नकार देतो, तेव्हा प्रद्योत त्याचं अपहरण करतो आणि त्याला कैदेत ठेवतो. अर्थातच वासवदत्ताला वीणा शिकवणं उदयनला भाग पडतं.

पण, वीणेच्या प्रशिक्षणकाळात घडलेल्या सहवासातून उभयतांचं परस्परांवर प्रगाढ प्रेम बसतं. कलेच्या साक्षीने त्यांची प्रेमाराधना फुलत जाते; मात्र उदयनची सुटका करण्यासाठी यौगंधरायण यांनी अवंतीमध्ये हेर पेरलेले असतात. ते हेर वासवदत्तालाही उदयनच्या सुटकेच्या योजनेत सामील करून घेतात. त्यांच्या योजनेनुसार उदयन प्रद्योताच्या कैदेतून निसटतो आणि जाताना वासवदत्तालाही बरोबर घेऊन जातो. प्रद्योत राजालाही हेच हवं असतं. वासवदत्ताशी उदयनचा विवाह व्हावा, अशी त्याची इच्छा असते. म्हणूनच त्याने उदयनला बंदी बनवलेलं असतं. त्यामुळे उदयन आणि वासवदत्ता यांचा विवाह होतो आणि ती वत्सदेशाची महाराणी बनते.

विवाह झाल्यावर तर उदयन प्रणयाराधनात मग्न होतो. त्याने दिग्विजयाची महत्त्वाकांक्षा पूर्ण करावी, असं यौगंधरायण यांना वाटत असतं. दिग्विजय करायचा तर मगध देशाशीही संबंध प्रस्थापित करायला पाहिजेत, असं अमात्यांच्या मनात असतं. त्यासाठी त्यांनी मगधनरेश दर्शक यांची भेट घेऊन त्यांची कन्या पद्मावती हिचा हात उदयनसाठी मागितलेला असतो; पण उदयनचं वासवदत्तावर खूप प्रेम आहे, हे त्यांच्या कानावर

गेलेलं असतं. त्यामुळे पद्मावतीला दुय्यम स्थानावर पाठविण्यास ते तयार नसतात. यौगंधरायण यांची मात्र दिग्विजयासाठी तरी हा संबंध व्हावा, अशी इच्छा असते. ती इच्छा पूर्ण करण्यासाठी ते एक योजना आखतात. काय असते त्यांची योजना? ती फलद्रूप होते का?

ही कादंबरी महाकाव्यावर आधारित असल्यामुळे प्रदेशाची, लावण्यवतींची, शृंगाराची वर्णनं यात येतात, उदयन संगीतप्रेमी असल्यामुळे सांगीतिक वर्णनामुळे या कादंबरीचं सौंदर्य द्विगुणित होतं. तर सौंदर्याविष्कार आणि रंजनाचा सुखद प्रत्यय ही कादंबरी देते.

✦


## भा. द. खेर यांची आम्ही प्रकाशित केलेली पुस्तके



दिग्विजय चाणक्य प्रबुद्ध








## राजेन्द्र खेर यांची आम्ही प्रकाशित केलेली पुस्तके

बिंदूसरोवर उदयन



## नवं कोरं



Book Available

अनुवादित अनुभवकथन

# साद घालतो कालाहारी

लेखक
**मार्क आणि डेलिया ओवेन्स**

अनुवाद
**मंदार गोडबोले**

निव्वळ एकजोडी कपडे घेऊन धरतीवरच्या सर्वात मोठ्या अस्पर्शित वाळवंटात आयुष्याची सात वर्षे घालवणारं एक अद्भुत जोडपं... ज्यानं कालाहारीच्या वाळवंटातलं अनभिज्ञ प्राणीजीवन जगासमोर आणलं, अशा मार्क आणि डेलिया ओवेन्सचे चित्तथरारक अनुभवकथन.




किंमत : ५३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकपरिचय




# बिंदुसरोवर

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**राजेन्द्र खेर**

## अद्‌भुतरम्य, उत्कंठावर्धक कादंबरी

माणसाचा भौतिक जीवनासाठी चाललेला संघर्ष आणि त्यामुळे आत्मतत्त्वापासून झालेली त्याची फारकत, हा तसा अस्वस्थ करणारा विषय; पण राजेन्द्र खेर यांनी हा विषय अद्‌भुताच्या आणि उत्कंठेच्या अवगुंठनातून प्रकट केला आहे, 'बिंदूसरोवर' या कादंबरीतून.

स्वामी शिवानंद आपल्या दोन शिष्यांसह हिमालयातील एका गुहेत साधना करीत असतात. त्यांच्याकडे पंचधातूची पेटी असते, ज्यात एक वैश्‍विक रहस्य जपलेलं असतं. चिनी सैनिक त्या पेटीची माहिती मिळवून शोध घेत शिवानंदांच्या गुहेपर्यंत पोहोचतात. योगी आपल्या विश्‍वनाथन् नामक शिष्याकडे पेटी सुपूर्द करून त्याला दूर रवाना करतात. प्रा. विश्‍वनाथन् यांच्याकडून व्याख्यानात अनवधानाने या रहस्याचा उल्लेख होतो... आणि पेटी हस्तगत करण्यासाठी अज्ञात व्यक्ती प्राध्यापकांच्या घरी पोहोचतात. तत्पूर्वी ते आपला सुहृद विक्रमकडे पेटी सोपवून त्याला दक्षिणेकडे पाठवतात.

ती रहस्यमय पेटी घेऊन त्रिवेंद्रमला जाणाऱ्या रेल्वेत विक्रम चढतो. ज्यांनी त्याला ऐन वेळेला रिझर्वेशन मिळवून दिलेलं असतं ते महानंद नावाचे गृहस्थ प्रवासात त्याच्याबरोबर असतात. त्यांची भौतिकवाद आणि अध्यात्म याबाबत विक्रमशी चर्चा सुरू असते. भारताची संस्कृती जाणून घ्यायला आलेला कीथ अंडरवूडही त्यांच्याबरोबर प्रवास करत असतो, तोही या चर्चेत सामील होतो. ती पेटी ज्या सॅकमध्ये असते, ती सॅक विक्रम जिवापाड जपत असतो. महानंद आणि कीथ विक्रमजवळ नसताना ऑस्कर नावाचा एक तरुण विक्रमकडे त्या पेटीची मागणी करतो आणि त्या बदल्यात त्याला बॅगभरून सोन्याची बिस्किटं देऊ पाहतो; पण विक्रमने नकार देताच तो त्याच्यावर गोळी झाडतो; मात्र विक्रम ती गोळी चुकवतो. तेवढ्यात महानंद तिथे येतात. विक्रम न राहवून त्यांना रहस्यमय पेटीविषयी सांगतो. ते त्याला पेटी उघडायला सांगतात. त्या पेटीत एक पिंड असते. ती पिंड बिंदूसरोवराचा निर्देश करत आहे आणि ज्याच्या हातात ही पिंड पडेल, तो सगळ्या विश्वावर नियंत्रण मिळवू शकतो, असं महानंद त्याला सांगतात. स्वामी शिवानंद आणि प्रा. विश्वनाथन् या दोघांनाही ते ओळखत असतात.

दरम्यान, ऑस्कर परत विक्रमवर हल्ला करण्याच्या इराद्याने त्यांच्या बोगीत येतो. बोगीला असलेल्या झरोक्यातून विक्रम आपली सॅक घेऊन रेल्वेच्या टपावर चढतो; पण ऑस्करही त्याच्यामागोमाग टपावर चढतो. ऑस्कर आता आपली सॅक हिसकावणार याची खात्री होताच विक्रम स्वत:ला दरीत झोकून देतो. योगायोगाने विक्रम, शंकर नावाच्या शेतकऱ्याच्या नजरेला पडतो. तो बेशुद्ध झालेल्या विक्रमला स्वत:च्या खोपटात घेऊन येतो. विक्रम शुद्धीवर आल्यावर यथाशक्ती त्याचं आदरातिथ्य करतो. विक्रमच्या पाठोपाठ ऑस्कर तिथेही पोचतो. विक्रम तिथून पळ काढतो आणि त्रिदंडी महाराजांच्या आश्रमात पोचतो. तेही बिंदू सरोवराचा उल्लेख करतात. कुठे असतं हे बिंदू सरोवर? विक्रम तिथपर्यंत पोचतो का आणि काय रहस्य असतं त्या बिंदू सरोवराचं, याचा उलगडा होण्यासाठी ही कादंबरी शेवटपर्यंत वाचली पाहिजे.

राजेन्द्र खेरांनी एका चांगल्या विषयाला मनोरंजकतेने हात घातला आहे. त्यामुळे ही कादंबरी शेवटपर्यंत वाचकाच्या मनाची पकड घेते.

✦



TBC-29 Book No. 3

**नवं कोरं**

# रिव्हर गॉड

**विल्बर स्मिथ**

अनुवाद : **सुभाष जोशी**




नाइल नदीच्या काठावरील प्राचीन इजिप्तचं वैभव आणि तत्कालीन सौंदर्यवादी विचारसरणीचं प्रतीक असणारी लालित्यपूर्ण कादंबरी...

**किंमत : ७५०/-रु. । TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत**

नवी संहिता... नवा आशय...

# समर्पण

**मंजुश्री गोखले**

संत कान्होपात्राचं भावविश्व चित्रित करणारी भक्तिरसानं ओथंबलेली मंजुश्री गोखले यांची कादंबरी




**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# सुरम्य सूर्यास्त

**दिनकर जोषी**


अनुवाद : **प्रतिभा काटीकर**

उतारवयातही आत्मसन्मानाचं बी पेरणारा साहित्य अकादमी विजेते गुजराती लेखक दिनकर जोषी यांनी सांगितलेला मूलमंत्र...




**किंमत : १९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**पुस्तकपरिचय**




# दृष्टिदाता

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

**पवित्रा मेहता**
**सुचित्रा शेणॉय**

अनुवाद

**ऋजुता खरे**

## एका सेवाव्रती डॉक्टरची आणि त्याच्या हॉस्पिटलची प्रेरणादायक यशोगाथा

*‘जनसेवेचे बांधून कंकण, त्रिभुवन सारे घेई जिंकून। अर्पून आपुले हृदसिंहासन, नित भजतो मानवतेला।।’* पी. सावळाराम यांच्या या ओळींचा मूर्तिमंत प्रत्यय देणारं एक व्यक्तिमत्त्व डॉ. व्ही अर्थात डॉ. गोविंदाप्पा वेंकटस्वामी. डॉ. व्ही यांचा सेवाभाव आणि त्यांचं दक्षिण भारतातील मदुराई शहरातील ‘अरविंद’ हे नेत्र रुग्णालय, यांच्याभोवती फिरणारं पुस्तक आहे, ‘Infinite Vision.’ पवित्र मेहता, सुचित्रा शेणॉय यांनी डॉ. व्ही यांच्या जीवनगाथेला शब्दरूप दिलं आहे. मराठीत अनुवाद केला आहे ऋजुता खरे यांनी. मराठी आवृत्तीचं शीर्षक आहे ‘दृष्टिदाता.’

पाच भावंडांनी मिळून ‘अरविंद’ची स्थापना केली. डॉ. गोविंदाप्पा वेंकटस्वामी, ज्यांना सगळं जग डॉ. व्ही म्हणून ओळखतं, ते या पाच जणांत सर्वांत मोठे. पित्याच्या अकाली मृत्यूनंतर त्यांनी आपल्या पाठच्या भावंडांची सर्वार्थानं जबाबदारी उचलली; त्यांचं शिक्षण, त्यांची कारकीर्द, इथपासून ते त्यांचे विवाह जमवण्यापर्यंत. स्वत: अविवाहित राहून त्यांनी स्वत:चं संपूर्ण आयुष्य आपल्या परिवारासाठी आणि नेत्रहीनांच्या सेवेसाठी वाहून घेतलं.

१९७६मध्ये डॉ. व्ही यांना एक कल्पना सुचली, गरीब रुग्णांसाठी नेत्र रुग्णालय सुरू करण्याची. त्यांच्या भावंडांनी आणि सहकाऱ्यांनी ही कल्पना उचलून धरली आणि ‘अरविंद’ची उभारणी झाली. १९७६मध्ये डॉ. व्हींनी ११ खाटांचं रुग्णालय सुरू केलं आणि नव्या सहस्त्रकाच्या पहिल्या दशकात तामिळनाडू राज्यात अरविंदची तीन नवीन रुग्णालयं सुरू झाली. फक्त पाच नेत्रतज्ज्ञांच्या साहाय्यानं डॉ. व्हींनी हे अभूतपूर्व काम करून दाखवलं होतं.

‘अरविंद’च्या या सगळ्या रुग्णालयांत मिळून तेहतीस शस्त्रक्रिया कक्ष आहेत. बघता बघता अरविंद आय केअर सिस्टीम ही जगातील सर्वांत जास्त शस्त्रक्रिया करणारी संस्था ठरली. २०१०पर्यंत ‘अरविंद’चा आवाका दर वर्षी पंचवीस लाख रुग्णांची तपासणी आणि तीन लाख शस्त्रक्रिया इतका वाढला. ‘अरविंद’मध्ये असणारा डॉ.व्ही यांच्या कुटुंबाचा सहभाग हळूहळू

वाढतच गेला.

वक्तशीरपणा हे 'अरविंद'चं उल्लेखनीय वैशिष्ट्य. सकाळी साडेसात वाजता इथलं कामकाज सुरू होतं. दुपारपर्यंत या सगळ्या व्यवस्थेमध्ये हजारो रुग्णांवर शस्त्रक्रिया झालेल्या असतात.

एम.बी.ए. झालेले डॉ. व्हींचे पुतणे डॉ. अरविंद श्रीनिवासन याच नेत्ररुग्णालयात कार्यरत आहेत. ते म्हणतात, ''डॉ. व्हींमुळे आमची जगाकडे पाहण्याची दृष्टीच बदलून गेली.'' ते पुढे सांगतात, ''गरिबांची सेवा करणं हे खरं सत्कार्य आणि गरिबांना जास्तीतजास्त सुविधा मोफत देणंच योग्य हा दृढ निश्चय त्यांनी आमच्यात रुजवला आहे.''

डॉ. व्हींचे भाचेजावई तुलसी रविला हे 'अरविंद'चे पहिले व्यवस्थापक. त्यांच्या माहितीनुसार 'युनायटेड किंगडममधील नॅशनल हेल्थ सर्व्हिसमार्फत प्रतिवर्षी सुमारे पाच लाख नेत्र शस्त्रक्रिया केल्या जातात आणि अरविंदमध्ये सुमारे तीन लाख. हे सगळं अरविंदमध्ये ब्रिटनच्या तुलनेत एक टक्क्याहूनही कमी किमतीत केलं जातं. यु.के.मधील नॅशनल हेल्थ सर्व्हिस नेत्रसेवांवर वर्षाला अदमासे दहा हजार कोटी रुपये खर्च करते आणि अरविंदमध्ये हा खर्च आहे केवळ शंभर कोटी. मोठी संख्या, उच्च दर्जा आणि वाजवी किंमत ही अरविंदची त्रिसूत्री आहे.

मॅकडोनाल्डच्या व्यावसायिक मूल्यांमुळे डॉ. व्ही प्रभावित झाले. ''विकसित देशात कनिष्ठ मध्यमवर्गीय लोकांना जसं हे फास्ट फूड माफक दरात उपलब्ध आहे त्याच प्रकारे विकसनशील देशात आपण मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया उपलब्ध करून द्यायला हव्यात,'' असं त्यांनी १९८०च्या शेवटी शेवटी एका मुलाखती दरम्यान जाहीर केलं.

अरविंदमध्ये होणाऱ्या नित्याच्या नेत्रतपासणीमध्ये नोंदणी, मूलभूत दृष्टीपरीक्षा, डॉक्टरांकडून केली जाणारी प्राथमिक तपासणी, डोळ्यांतील दाबाची मोजणी, बुबुळाचे प्रसरण आणि अंतिम तपासणी यांचा समावेश असतो. शस्त्रक्रिया करण्याची गरज असल्यास, रुग्णाला त्या शस्त्रक्रियेबद्दल इत्थंभूत माहिती देण्याच्या उद्देशाने समुपदेशन करण्यात येते. बहुतांश ठिकाणी या सर्व गोष्टी नेत्रतज्ज्ञांकडूनच केल्या जातात; पण अरविंदमध्ये मात्र रुग्णाच्या प्रवेशापासून ते त्याला रुग्णालयातून सोडण्यापर्यंतची सर्व कामे विशिष्ट गटांमध्ये विभागली गेली आहेत.

अशाच प्रकारे कामाची विभागणी अरविंदच्या शस्त्रक्रिया विभागात आणि शस्त्रक्रियोत्तर देखभाल विभागात केली गेली आहे. 'अरविंद'मधील शस्त्रक्रियांची संख्यात्मकता रुग्णांच्या हिताची ठरली आहे. कामाची रीतसर विभागणी केल्यामुळे कार्यक्षमता वाढते आणि परिणामी, रुग्णांचा वाट पाहण्यात जाणारा वेळ वाचतो. अवघड कामं वारंवार केल्यानं त्यांचा दर्जा सुधारतो आणि दृश्य वैद्यकीय परिणामही सुधारतात. जी कामं करण्यासाठी वैद्यकीय ज्ञानाची आवश्यकता नाही अशी कामं साहाय्यकांवर सोपवल्यानं सर्व रुग्णांकडे व्यक्तिगत लक्ष तर पुरवता येतंच; पण त्याचबरोबर ती कामं कमी खर्चात करता येतात. हे तीन घटक एकत्रितरीत्या कामाची व्याप्ती वाढवायला आणि माफक दरात सेवा उपलब्ध करून द्यायला मदत करतात. शिवाय यामुळे रुग्णांना मिळणारे चांगले अनुभव आणि सेवेचा दर्जा उत्तम राहतो ते वेगळंच.


आपल्या व्यवस्थेमध्ये विनाकारण विलंब आणि टाळता येण्याजोग्या चुका तर होत नाहीत ना, याचं सतत परीक्षण करत राहण्याची आणि या रचनेतले कोणते छोटे छोटे बदल महत्त्वाचे परिणाम घडवू शकतात याचा शोध घेत राहण्याची शिकवण डॉ. व्हींनी त्यांच्या सहकाऱ्यांना दिली आहे. अनेक दशकांपासून ते लिहीत असलेल्या दैनंदिनीत या विचारांचं प्रतिबिंब उमटलेलं दिसून येतं.

व्ही. कस्तुरीरंगन ऊर्फ कॅश यांनी अरविंदमधल्या व्यवस्था, रचना यांचा अभ्यास केला. अरविंदला दिलेल्या भेटीनंतर केम्ब्रिजला परत जाऊन त्यांनी एक २६ पानी अहवाल तयार केला. कॅश म्हणतात, ''हा अहवाल कालातीत आहे, डॉ. व्हींची कळकळ आणि द्रष्टेपणा यामुळे त्याला चिरस्थायीपणा आला आहे.''

तर अशी डॉ. व्ही यांची जीवनगाथा आणि पर्यायाने 'अरविंद'ची यशस्वी, शिस्तबद्ध वाटचाल नक्कीच प्रेरणादायक आहे. ऋजुता खरे यांच्या कुशल अनुवादामुळे ही जीवनगाथा प्रभावी रीतीने वाचकांपर्यंत पोचते.

✦

पुस्तकपरिचय




# महागाई एक चक्रव्यूह

(ई-बुक स्वरूपात उपलब्ध)

## हिमसागर जयवंत ठाकूर

## महागाईचा विविधांगाने वेध घेणारं पुस्तक

अर्थकारणातील ‘महागाई’ हा शब्द सर्वसामान्यांच्या फार जवळचा (आवडीचा नव्हे) आहे. या महागाईवर आणि तिच्याशी संबंधित विविध पैलूंवर विस्तृत भाष्य करणारं पुस्तक आहे ‘महागाई एक चक्रव्यूह.’ हिमसागर जयवंत ठाकूर यांनी हे पुस्तक लिहिलं आहे.

इंग्रजी पुस्तक ‘रिच डॅड आणि पुअर डॅड’ हे पुस्तक वाचल्यावर महागाई या विषयाबाबतच्या ठाकूर यांच्या माहितीत भर पडली. त्यामुळे हे पुस्तक लिहिण्यास ते उद्युक्त झाले असावेत. महागाई का वाढते, महागाईचे चक्र कसे फिरते, महागाई आपल्याच चुकीच्या धोरणामुळे वाढते का, महागाई कमी करण्यासाठी भारत सरकार आणि रिझर्व्ह बँक कुठकुठली पावले उचलतात इ.गोष्टींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. तसेच, काही गोष्टींचा प्रत्यक्षरीत्या किंवा अप्रत्यक्षरीत्या महागाईवर आणि पर्यायाने आपल्या रोजच्या जीवनावर कसा परिणाम होतो, यावरसुद्धा त्यांनी या पुस्तकात प्रश्नोत्तरांच्या माध्यमाने काही भाष्य केलं आहे.

महागाईवाढीस कारणीभूत असलेल्या गोष्टींवर त्यांनी काही छोटे-मोठे उपाय सुचवले आहेत. वाचताना काही काही गोष्टी अशा वाटतात की याचा महागाईशी काय संबंध? पण संपूर्ण पुस्तक वाचून झाल्यावर आपल्याला त्या गोष्टीचा आणि महागाईचा संबंध लक्षात येतो. काही काही गोष्टींचा संबंध दोन विविध लेखांत असल्याकारणाने ती गोष्ट दोन किंवा तीन विविध लेखांद्वारे मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी सरकारकडे जादूची कांडी आहे असे मानण्यापेक्षा सर्वसामान्यांनी या समस्या सोडवण्यास सरकारला मी कसा मदत करू शकतो, याचा विचार करावा, असाही एक विचार हे पुस्तक देऊन जातं. नेहमी कानावर पडणाऱ्या किचकट अर्थव्यवस्थेच्या गोष्टी सोप्या उदाहरणांच्या माध्यमातून मांडल्यामुळे सर्वसामान्य वाचकालाही हे पुस्तक आवडेल.

✦

**१६ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२० दरम्यानचा दिनविशेष**

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान खास सवलत**

**२१ ऑक्टोबर - अल्फ्रेड नोबेल यांचा जन्मदिन**
'नोबेल ललना - भाग १', 'नोबेल ललना - भाग २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३१५/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२१ ऑक्टोबर - पॉल विल्सन यांचा जन्मदिन**
'शांततेनं काम करा!' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**२३ ऑक्टोबर - मायकेल क्रायटन यांचा जन्मदिन**
'नेक्स्ट', 'पायरेट लॅटिट्यूड्स', 'प्रे (सावज)', 'स्टेट ऑफ फिअर', 'मायक्रो', 'डिस्क्लोजर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २३००/- । सवलत किंमत १३९९/-**

---

**२३ ऑक्टोबर - अरविंद अडिगा यांचा जन्मदिन**
'द व्हाईट टायगर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२४ ऑक्टोबर - रोशन दलाल यांचा जन्मदिन**
'सत्तरीतला भारत' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२४ ऑक्टोबर - आर. के लक्ष्मण यांचा जन्मदिन**
'कसं बोलतात! भाग १ ते ७' या पुस्तकावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ६६५/- । सवलत किंमत ३८२/-**

---

**२६ ऑक्टोबर - हिलरी क्लिंटन यांचा जन्मदिन**
'हिलरी क्लिंटन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २७०/- । सवलत किंमत १९९/-**

'लिव्हिंग हिस्ट्री' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३२९/-**

---

**२७ ऑक्टोबर - ॲरन राल्स्टन यांचा जन्मदिन**
'ते १२७ तास!' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२९ ऑक्टोबर - ली चाइल्ड यांचा जन्मदिन**
'नथिंग टू लूज', 'वन शॉट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ६९०/- । सवलत किंमत ३९९/-**

---

**३० ऑक्टोबर - डेव्हिड बेनब्रिज यांचा जन्मदिन**
'टीनएजर्स' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २२९/-**

---

**खालील संचांवर १ ते १५ नोव्हेंबर दरम्यान खास सवलत**

**२ नोव्हेंबर - जयश्री कुलकर्णी यांचा जन्मदिन**
'मांजराची सावली', 'विषवल्ली' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२ नोव्हेंबर - कविता भालेराव यांचा जन्मदिन**
'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग - १', 'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग - २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२ नोव्हेंबर - अरुण शौरी यांचा जन्मदिन**
'अनिताला जामीन मिळतो', 'गव्हर्नन्स', 'हे सर्व आपल्याला कोठे नेणार?', 'कळेल का 'त्याला' आईचं मन?', 'मागील पानावरून...

मागेच!,' 'द पार्लमेन्टरी सिस्टिम', 'वाळवीग्रस्त वृक्षाला पोलादी कुंपण वाचवेल का?', 'ख्यातनाम इतिहासकार' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३२५०/- । सवलत किंमत १९९९/-**

---

**२ नोव्हेंबर - ल्यूसी हॉकिंग यांचा जन्मदिन**

'जॉर्ज ॲन्ड द बिग बँग', 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट', 'जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १४८५/- । सवलत किंमत ९९९/-**

---

**३ नोव्हेंबर - डॉ. लीला गोविलकर यांचा जन्मदिन**

'मराठीचे व्याकरण' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**५ नोव्हेंबर - रिचर्ड होम्स यांचा जन्मदिन**

'चर्चिलच्या पाऊलखुणा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३९९/-**

---

**५ नोव्हेंबर - डॉ. अतुल गवांदे यांचा जन्मदिन**

'बीइंग मॉर्टल', 'बेटर', 'जीव जिथे गुंतलेला...', 'यशप्राप्तीचा जाहीरनामा!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०९०/- । सवलत किंमत ७४९/-**

---

**६ नोव्हेंबर - श्याम भुर्के यांचा जन्मदिन**

'आनंदाचं पासबुक', 'गोष्टींचं एटीएम', 'खुमासदार अत्रे', 'मंत्र श्रीमंतीचा', 'पु. ल. : एक आनंदयात्रा', 'पुणं एक साठवण', 'सभेत कसे बोलावे', 'द माइंड जिम', 'द स्टार प्रिन्सिपल', 'द माइंड जिम रिलेशनशिप्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २०००/- । सवलत किंमत १२९९/-**

---

**६ नोव्हेंबर - डॉ. संजय ढोले यांचा जन्मदिन**

'अंतराळातील मृत्यू', 'अश्मजीव', डिंभक', 'प्रेमाचा रेणू', 'संकरित' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०२५/- । सवलत किंमत ५९९/-**

---

**७ नोव्हेंबर - हेलन गार्नर यांचा जन्मदिन**

‘एक विश्रांती स्थळ!’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**७ नोव्हेंबर - डॉ. रत्नावली दातार यांचा जन्मदिन**

‘सुखद बालसंगोपन’, ‘सुखद मातृत्व’, ‘सुखद वृद्धत्व’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३२५/- । सवलत किंमत १९९/-**

---

**७ नोव्हेंबर - जागतिक कर्करोग जागरूकता दिन**

'Cancer Care & Mysteries & Yoga', ‘इट्स नॉट अबाउट द बाइक’, ‘द जॉय ऑफ कॅन्सर’, ‘कॅन्सर रोखू या’, ‘आयुष्याचा अंतिम संस्कार’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११९०/- । सवलत किंमत ७४९/-**

---

**११ नोव्हेंबर - सुरेखा शहा यांचा जन्मदिन**

‘थेंबभर पाणी अनंत आकाश’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**१२ नोव्हेंबर - ख्रिस्तोफर रिच यांचा जन्मदिन**

‘रुल्स ऑफ डिसेप्शन’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४८०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**१३ नोव्हेंबर - ना. रा. वडनप यांचा जन्मदिन**

‘बुद्धिबळ शिका’, ‘बुद्धिबळाचा ओनामा’, ‘बुद्धिबळाचा श्रीगणेशा’, ‘चतुरंग (बुद्धिबळातील) सापळे’, ‘सुसंघटित मारा (बुद्धिबळ)’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७९५/- । सवलत किंमत ४९९/-**

---

**१४ नोव्हेंबर - बालदिन**

**संच १**- ‘बंटू बसला ढगात’, चित्रमय रंगतदार कथा भाग १ (‘बुडबुड्यांचे

विमान आणि इतर गोष्टी', 'चालणारा हिमपुतळा', 'छोटुसा पांढरा ससुकला', 'छोटू किल्लीवाला उंदीर'), चित्रमय रंगतदार कथा भाग २ ('गोष्टी पानोपानी आणि इतर कथा', 'गोष्टी कानोकानी', 'गोष्टी मनोमनी'), चित्रमय रंगतदार कथा भाग ३ ('चालणारे बूट आणि मजेदार गोष्टी', 'जादूचा अंगरखा', 'पतंगाची करामत', 'पिनू-चिनूची चतुराई'), चित्रमय रंगतदार कथा भाग ४ ('गम्मत गोष्टी', 'धमाल गोष्टी', 'मजेदार लोककथा', 'आदर्श लोककथा'), चित्रमय रंगतदार कथा भाग ५ ('सुंठ बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा', 'निद्राराणी आणि इतर कथा', 'बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी', 'गर्विष्ठ सूर्यफूल आणि गम्मत गोष्टी'), चित्रमय रंगतदार कथा भाग ६ ('चतुर बोकोबा आणि इतर कथा', 'नशीबवान शेखर', 'लोखंड खाणारे उंदीर'), चित्रमय रंगतदार कथा भाग ७ ('टिंबकटू आणि इतर कथा', 'सोन्याचा पाऊस', 'ड्रॅगनचं घर'), चित्रमय रंगतदार कथा भाग ८ ('मैत्रीचे मोल आणि इतर कथा', 'घारीची चलाखी', 'गर्विष्ठ घोडा'), चित्रमय रंगतदार कथा भाग ९ ('आजीचा धडा', 'पत्राचा प्रवास', 'पैज जिंकली छोट्यानं आणि इतर कथा'), चित्रमय रंगतदार कथा भाग १० ('कसोटी आणि इतर कथा', 'बुद्धिरामाचा न्याय आणि चातुर्यकथा', 'इमानी मित्र आणि इतर गोष्टी', 'पंचरंगी खार आणि इतर गोष्टी'), चित्रमय रंगतदार कथा भाग ११ ('प्रधानाची निवड आणि चातुर्यकथा', 'सत्त्वपरीक्षा आणि इतर कथा', 'आजीचं घर आणि इतर कथा', 'एकमेका साह्य करू आणि इतर गोष्टी'), चित्रमय रंगतदार कथा भाग १२ ('ठकुबाई ठेंगे आणि जम्मत गोष्टी', 'बुटुकबैंगण विसरभोळे आणि जम्मत गोष्टी', 'रमज्या गमज्या आणि जम्मत गोष्टी'), चित्रमय रंगतदार कथा भाग १३ ('खट्याळ खलाशी', 'अस्वलाची शेपटी', 'घड्याळातली कोकिळा आणि गडबड गोष्टी') या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २८३०/- । सवलत किंमत १४१५/-**

**संच २ -** ससोबा-हसोबा मालिका भाग २ ('शूर ससोबा', 'छत्रीची जादू आणि इतर कथा', 'झॅकपॅक शोध आणि इतर कथा'), 'दोस्ती', 'खुलदाबादचा खजिना', जंगल जंमत मालिका भाग १ ('गाढवाचं गाणं आणि जंमत गोष्टी', 'सिंहाचं उड्डाण', 'फट्फजिती', 'बूम बूम बैल', 'तीन छोटे मासे', 'जांभळे आंबे आणि जम्मत गोष्टी'), जंगल जंमत मालिका भाग २ ('तल्लख मोती आणि जंमत गोष्टी', 'लालतोंडी चोर', 'उंटाची मान', 'सोनेरी चोच', 'पिंटू पेलिकन'), चित्रमय बोधकथा भाग १ ('महाकवि कालिदास आणि बोध कथा' / 'मोह' / 'न्याय'), एल्मर मालिका ('एल्मर',

‘एल्मर आणि अनोळखी पाहुणा’, ‘एल्मर आणि हरवलेला टेडी’, ‘एल्मर आणि वारा’, ‘एल्मर आणि बिल्वर’), कांगारू देशीच्या गोष्टी (‘चहा साखरेचा नाताळ’, ‘रेडिओ रेस्क्यू!’, ‘नववर्षाची अनपेक्षित भेट!’, ‘रात्रीचे राक्षस’) ‘जादूमंतर छू आणि इतर कथा’, ‘मर्कटराजा आणि इतर कथा’, ‘हनुमान’, ‘शिकारी बनला शिकार’, ‘समादचा वाळवंटातील व रानातील फेरफटका’, ‘जादूचं रबर आणि इतर गोष्टी’ / ‘जादूचं बटण’ / ‘जादूचं तळं’, गोष्टी देशोदेशीच्या (‘हस्तिदंती छडी आणि गोष्टी देशोदेशीच्या’ / ‘लैलाचा दिवा’ / ‘सूर्याची चोरी’), चित्रमय रंगतदार कथा भाग १४ (‘जादूचं खीरपात्र’, ‘गंपू चिंपू’, ‘सिंड्रेला आणि इतर कथा’) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३०८०/- । सवलत किंमत १५४०/-**

**संच ३ -** ससोबा-हसोबा मालिका भाग १ (‘शेपटीवालं झाड आणि इतर कथा’, ‘ससुल्या आणि इतर कथा’, ‘चला चहा पिऊया’), ‘ग्रेटाची गोष्ट’, ‘मोठ्यांच्या छोट्या गोष्टी’, ‘पंचतंत्रातील गोष्टी’ (५ पुस्तकांचा संच), ‘जातक कथा’ (४ पुस्तकांचा संच), ‘हितोपदेश कथा’ (४ पुस्तकांचा संच), निसर्ग आणि इतर गोष्टी (‘‘गीर’जंगल’, ‘जीवदान’, ‘कौतुक’, ‘मैत्री’, ‘सृष्टी’), गोष्ट डॉट कॉम भाग १ (‘बोलका उंट’, ‘चेटकिणीशी गट्टी जमली’, ‘हुप्पूगुप्पूचे घर’), गोष्ट डॉट कॉम भाग २ (‘ढवळ्या झाला नंदी’, ‘हत्ती आला घरी’, ‘खेळातील कुत्रा’), गोष्ट डॉट कॉम भाग ३ (‘प्रचंड भोपळ्यातला राक्षस’, ‘सोनूचा धडा’, ‘तळ्याकाठची मैत्री’, ‘यक्षाचे ढोलके’) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २२५५/- । सवलत किंमत ११२७.५/-**

**संच ४ -** फ्रँकलिन मालिका (२९ पुस्तके), बब्बड मालिका भाग १ (‘चंपी मालीश आणि था.. था.. था..’, ‘दांडोबा राक्षस आणि गुळगुळीत मावशी’, ‘गुळाची ढेप आणि सरबत’, ‘सू सुटका आणि रंगीत डोंगर’), ‘गंमत कोडी - भाग १ ते ५’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १९४५/- । सवलत किंमत ९७३/-**

**संच ५ -** ‘आपली सृष्टी’ (१० पुस्तकांची मालिका), चरित्र मालिका रा. वा. शेवडे गुरुजी (२१ पुस्तकांचा संच) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३१८०/- । सवलत किंमत १५९०/-**

**संच ६ -** विक्रम वेताळ मालिका भाग १ (‘पुतळे जिवंत झाले आणि इतर कथा’, ‘राजपुत्राचा निर्णय’, ‘गुप्त खजिना’, ‘खरं बक्षीस’), विक्रम वेताळ मालिका भाग २ (‘दैवी सिंहासन आणि इतर कथा’, ‘टेकडीवरचं देऊळ’,

'जादूची साखळी', 'समुद्रातील अप्सरा'), विक्रम वेताळ मालिका भाग ३ ('राजाचे रक्षण आणि इतर कथा', 'राजाची साधना', 'जादूचा रत्नहार', 'ज्योतिषाचं नशीब'), बिरबल मालिका भाग १ ('बुद्धिमान बिरबल', 'चतुर बिरबल', 'लाजवाब बिरबल', 'विनोदवीर बिरबल'), बिरबल मालिका भाग २ ('आईची तळमळ', 'अजब आज्ञापालन', 'कडीवर कडी', 'बादशहाचा विचित्र हट्ट', 'बालहट्ट'), बिरबल मालिका भाग ३ ('कपिलेचा मालक कोण?', 'बोलकी थैली', 'हा रस्ता कुठे जातो?', 'मूर्खांचा शोध', 'शुभ आणि अशुभ'), विज्ञान नवलाई ('अंतराळ', 'आपले पूर्वज', 'भूगोल', 'खगोल', 'पशू-पक्षी', 'प्राणिजगत') या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २२१०/- । सवलत किंमत ११०५/-**

**संच ७** - विल्यम शेक्सपिअर (२१ पुस्तकांचा संच), 'यज्ञकुंड', 'मध्यरात्र', 'घरटे', 'सूर्यास्त', 'अस्थी', 'सैनिकहो तुमच्यासाठी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १८३०/- । सवलत किंमत ९१५/-**

---

**१४ नोव्हेंबर - जागतिक मधुमेह दिन**

'चला जाणून घेऊ या! मधुमेह', 'मधुमेह एक आव्हान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

---


**१५ नोव्हेंबर - संजय राऊत यांचा जन्मदिन**

'एकवचनी भाग १ व २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५९९/-**

✦

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**
**website : www.mehtapublishinghouse.com**
आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा
या ईमेलवर पाठवा. **author@mehtapublishinghouse.com**


नवे कोरे
कोरोनाच्या
वैश्विक संकटाचा
विविधांगी आढावा...
युद्ध कोरोनाशी
वाचवू या जीवसृष्टी
युद्ध कोरोनाशी
वाचवू या जीवसृष्टी
डॉ. अनिल गांधी
लेखक
डॉ. अनिल गांधी
Book Available

**Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020**
**RNI. No. MAHMAR/2000/02739**
**No. CSO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/10/2020 Posting Date : 11/10/2020

## नवीन संहिता... नवा आशय...













**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ______________________